सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०३ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ९१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पोलिसांच्या अनुकंपा नियुक्त्यांचा निर्णय मिशन मोडवर राबविला जाणार - मुख्यमंत्री

मुंबई, २ जुलै : राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदर्भातील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. त्याचबरोबर अनुकंपा भरतीसंदर्भात सर्व विभागांना आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी पोलिसांच्या कामकाजातील सुधारणा, गृहनिर्माण, आरोग्य, मानसिक आरोग्य व इतर सुविधांच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, संजय खोडके, भाई जगताप, बंटी पाटील या सदस्यांनीही सहभाग घेतला.

पोलिसांच्या ड्युटीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सर्वप्रथम मुंबईतच ८ तासांची ड्युटी ही संकल्पना लागू करण्यात आली. काही वेळा सण-उत्सव किंवा बंदोबस्ताच्या वेळी यात अपवाद असतात, तरीही एकूणच पोलिसांची ८ तासाची ड्यूटी आता स्थिर झाली आहे. तसेच पोलिसांना साप्ताहिक सुट्टी देण्याची सुरुवात राज्यभर झाली असून, काही कारणास्तव सुटी न मिळाल्यास त्याचे 'एनकॅशमेंट'ही मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आले आहे. आधी ही एनकॅशमेंटची रक्कम कमी होती, ती आता वाढवली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुंबईसह राज्यभरात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प राबवले जात आहेत. तालुका स्तरावरही काम वेगाने सुरू आहे. पोलिस गृह निर्माण महामंडळाचे काम अभूतपूर्व असल्याचे त्यांनी नमूद केले. डीजी लोन योजनेचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही योजना सुरू केली होती. मात्र, नंतरच्या सरकारच्या काळात ती बंद झाली होती. आता नव्याने ती योजना पुन्हा सुरू करण्यात आली असून, बॅकलॉग निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांमध्ये जीवनशैलीशी संबंधित वाढणाऱ्या आजारांवर लक्ष देत, ४० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून एकदा आणि ५० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच, पोलिसांच्या मानसिक आरोग्यासाठी काउन्सिलिंग व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवादाची विशेष योजना राबवली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी उत्तरात सांगितले की, नवी मुंबईत पोलिसांसाठी उभारण्यात आलेल्या १० हजार क्षमतेच्या सदनिकेसाठी शासनाने सहकारी सोसायटीला सर्वतोपरी मदत केली. अशा प्रकारे सहकार्याने पोलिस एकत्र आले तर त्यांच्या गृहनिर्माणासाठी शासनाची संपूर्ण मदत मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी - अजित पवार



मुंबई : शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचंच सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करीत विरोधी पक्ष सदस्यांना सभागृहात गोंधळ न घालण्याचे आवाहन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत म्हणाले की, विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालू नये. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. सरकार चर्चे पासून पळ काढणार नाही, हे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेतच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. विरोधी पक्षांना त्यांच्या उद्याच्या ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या अडचणींची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. कोणतीही अडचण असो, सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहे आणि राहणार आहे. आम्ही केवळ बोलत नाही, तर प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवतो. शेती ही आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित साधणे, त्यांचे प्रश्न सोडवणे हे सरकारच्या धोरणात सर्वोच्च प्राधान्याने आहे. कोणत्याही परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना एकटे पडू देणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील बळीराजाच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे असल्याचा पुनरुच्चार केला.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर स्थगन प्रस्ताव फेटाळला

## विरोधक आक्रमक, दोनवेळा सभात्याग

मुंबई, २ जुलै - शेतकर्यांच्या प्रश्नावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज (२ जुलै) विधानसभेत स्थगन प्रस्ताव दिला होता; मात्र शेतकर्यांच्या प्रश्नावर उद्या, ३ जुलै या दिवशी विरोधकांनी सभागृहात प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार संपूर्ण दिवसभर या प्रश्नावर चर्चा केली जाईल, असे विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगून विरोधकांचा स्थगन प्रस्ताव फेटाळला. त्यामुळे शेतकरी प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, चर्चा टाळत आहे, असा आरोप केला, तसेच सरकारचा निषेध करत विरोधकांनी सभागृहात घोषणा देऊन २ वेळा सभात्याग केला.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, कृषीमंत्री शेतकर्यांना भिकारी म्हणतात. माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकर्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अवमान करतात. शेतकर्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना पैसे मिळाले नाही. कापसाला भाव मिळालेला नाही. सरकारने शेतकर्यांच्या मालाला दीडपट भाव देऊ असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको. शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी सरकार २१ हजार कोटी मान्य करतात; पण शेतकरी कर्जमाफीसाठी पैसे नाहीत का ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# ट्रम्प लवकरच भारतासोबत करणार व्यापार करार

## व्यापार संबंधांमध्ये हा एक मोठे वळण ठरणार



वॉशिंगटन , २ जुलै - भारत आणि अमेरिका व्यापार करार करणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये सुरू होती. आता स्वतः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी (दि. १) याची पुष्टी केली. ट्रम्प यांनी संकेत दिले की, भारत अमेरिकन कंपन्यांवरील कर कमी करण्यास तयार आहे, ज्यामुळे अमेरिकन कंपन्यांना भारतात व्यवसाय करण्याची संधी मिळेल.

माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, 'मला वाटते की, आमचा भारतासोबत वेगळ्या प्रकारचा व्यापार करार होईल. असा करार ज्यामध्ये आम्ही भारतात जाऊन खुलेपणाने स्पर्धा करू शकू. भारताने आतापर्यंत परदेशी कंपन्यांसाठी बाजारपेठ उघडली नव्हती, परंतु आता त्यात बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. जर भारताने असे केले, तर अमेरिका कमी करासह एक मजबूत व्यापार करार करेल.'

भारताने अमेरिकन उत्पादनांसाठी आपला दुग्ध बाजार खुला करावा असे अमेरिकेला वाटते, परंतु भारताने स्पष्ट केले आहे की, ते या मागणीवर तडजोड करणार नाही. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, दुग्धव्यवसायावर सवलतीचा प्रश्नच उद्भवत नाही. ही आमच्यासाठी लाल रेषा आहे. भारतातील दुग्धव्यवसाय क्षेत्रात सुमारे ८ कोटी लोक रोजगार करतात, ज्यापैकी बहुतेक लहान शेतकरी आहेत. अशा परिस्थितीत, सरकारला या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची सवलत देणे शक्य नाही. वृत्तानुसार, भारतीय अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ गेल्या आठवड्यापासून सोमवारपर्यंत वॉशिंग्टनमध्ये अमेरिकन प्रशासनाशी चर्चा करत होते. विशेष सचिव राजेश अग्रवाल हे भारतातील या शिष्टमंडळाचे नेतृत्व करत असून, त्यांनी गतिरोध दूर करण्यासाठी त्यांचा दौरा आणखी एक दिवस वाढवला आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी भारतावर २६ टक्के कर (आयात शुल्क) लादण्याची घोषणा केली होती, जी ९० दिवसांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. तथापि, किमान १० टक्के कर अजूनही लागू आहे. जर दोन्ही देशांदरम्यान हा करार झाला, तर व्यापार संबंधांमध्ये हा एक मोठे वळण ठरू शकते.

# अंमलीपदार्थ तस्करीसंदर्भात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा - मुख्यमंत्री

मुंबई, २ जुलै : 'एनडीपीएस'अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करी संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात गेल्या दोन-अडीच वर्षांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या मदतीने आता राज्यस्तरीय आणि आंतरराज्यीय समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. सर्व राज्यांमध्ये 'इंटेलिजन्स' शेअरिंग सुरू असून त्यामुळे तस्करांवर एकत्रितपणे कारवाई शक्य झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

व्यसनमुक्तीसाठीची केंद्रे महत्त्वाची असून सध्या त्यांची संख्या आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी योग्य धोरण तयार करून दर्जेदार व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गांजाच्या शेतीवर बंदी असून ती मध्यप्रदेशातही कायदेशीर नाही, हे स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, गांजा, गुटखा किंवा तत्सम पदार्थांची तस्करी होत असल्यास त्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल.

# शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर १६ जुलैला होणार सुनावणी

नवी दिल्ली : शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने सर्वोच्च न्यायालयात पक्षाच्या निवडणूक चिन्हाबाबत सुरू असलेल्या प्रकरणाची सुनावणी लवकर घेण्याची मागणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे ही सुनावणी आवश्यक असल्याचे उद्धव सेनेच्या वकिलांनी सांगितले. परंतू, सर्वोच्च न्यायालयाने त्यावर त्वरित सुनावणी घेण्यास नकार दिला असून येत्या १६ जुलै रोजी नियमित खंडपीठासमोरच हा विषय मांडला जाईल, असे सांगितले.

उद्धव सेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी बुधवारी (दि.२) स्थानिक निवडणुकांचा हवाला देत पक्षाच्या निवडणूक चिन्हाबाबत लवकर सुनावणीची मागणी केली. या मागणीला विरोध करताना शिंदे गटाच्या वकिलांनी सांगितले की, निवडणूक चिन्ह वाटपानंतर २ महत्त्वाच्या निवडणुका (लोकसभा आणि विधानसभा) झाल्या आहेत. ७ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नियमित खंडपीठासमोरही हीच मागणी करण्यात आली होती. यावेळी खंडपीठाने या प्रकरणाची लवकरच सुनावणी घेण्यास नकार दिला. आता पुन्हा एकदा सुट्टीतील खंडपीठासमोरही तोच प्रयत्न केला जातोय. त्यावर उद्धव सेनेच्या वकिलांनी म्हटले की, ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार-अजित पवार वादात दिलेल्या व्यवस्थेची मागणी करत आहेत. यावर न्यायमूर्ती एमएम सुंदरेश यांच्या अध्यक्षतेखालील सुट्टीतील खंडपीठाने त्यांना १६ जुलै रोजीच आपला मुद्दा मांडण्यास सांगितले आहे.

दरम्यान, १७ फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांचा शिवसेनेवरील दावा योग्य असल्याचे म्हटले होते. आयोगाने शिवसेनेचे मूळ निवडणूक चिन्ह 'बाण-धनुष्य' हेदेखील शिंदे गटाला दिले होते. याविरुद्ध उद्धव गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. तेव्हापासून हे प्रकरण प्रलंबित आहे. या काळात लोकसभा, विधानसभा निवडणूक पार पडली आता शिवसेनेचा जीव असलेली मुंबई महापालिका निवडणूक तोंडावर आहे. यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला त्यांचे परंपरागत निवडणूक चिन्ह धनुष्यबाण हवे आहे. यासाठी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी घेण्यासाठी मागणी करण्यात आली आहे.

# राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान : एकनाथ शिंदे

मुंबई : राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली. विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.

# डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सल्लागार समितीची बैठक संपन्न


अहिल्यानगर, दि. २ - वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये समाविष्ट करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाच्या सूचनेनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सल्लागार समितीची बैठक पार पडली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी मार्गदर्शन केले.

बैठकीस जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, नाबार्डचे विक्रम पठारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाच्या सूचनेनुसार संपूर्ण देशभरात १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत आर्थिक समावेशन योजनांची संपृक्तता मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम जिल्ह्यात विशेष उपक्रम म्हणून प्रभावीपणे राबविण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

या मोहीमेअंतर्गत सर्व खातेधारकांच्या केवायसी (घधउ) पुनर्पडताळणीसह विद्यमान निष्क्रिय झचगऊ्ध खात्यांचे पुनरुज्जीवन, बँक खाती नसलेल्या प्रौढांसाठी नवी खाती उघडणे, तसेच PMJJBY (प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना), PMSBY (प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना), आणि APY (अटल पेन्शन योजना) अंतर्गत नोंदणी यास प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच डिजिटल फसवणुकीपासून संरक्षण, दावा न केलेल्या ठेवींच्या पुनर्प्राप्तीसाठी मार्गदर्शन, व तक्रार निवारण प्रणाली याविषयी जनजागृती सत्रे घेण्यात यावीत, असेही त्यांनी सुचवले. या विशेष मोहीमेत उमेद, महिला आर्थिक विकास महामंडळ आणि एनयूएलएम विभागाचे अधिकारी सक्रिय सहभाग नोंदवून बँकांना सहकार्य करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नागरिकांना PMJJBY, PMSBY आणि APY योजनांमध्ये नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. यासाठी बँक शाखा, शिबिरस्थळे व बँक व्यवसाय प्रतिनिधींनी गावोगावी जाऊन जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिले.

# चितेगाव येथील प्लॉटींग व्यवसायकाची हत्या

## अपहरणकर्ते सहा आरोपी ताब्यात



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ जुलै :

पैठण तालुक्यातील चितेगाव येथील प्लाटींग व्यवसायिकाची अपहरण करून हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली असुन या प्रकरणी बिडकीन पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले आहे. चितेगाव ता पैठण येथील शेख अकबर शेख महेबूब ऊर्फ मियांभाई यांचे दि ३० जुन रोजी दुपारी १२ वाजेदरम्यान कामानिमित्ताने चार चाकी घेऊन (एम.एच.२० एचएन ४४८८) घेऊन घराबाहेर पडले आसता त्यांचे अपहरण करून खून करण्यात आला आसल्याची फिर्याद त्यांच्या मुलगा सामील शेख याने दिली आहे. या फिर्यादीवरून बिडकीन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुर्व वैमनस्यातून वाहेद याकुब शेख, लतीफ याकुब शेख, मोबीन मुनाफ सय्यद तिघेही चितेगाव ता पैठण शाहरुख उर्फ फजल सरदार शेख रा कायगाव ता गंगापूर सोनाजी ताराचंद भुजबळ रा दहिफळे ता शेवगाव व इकबाल अहमद जमादार रा जैन स्पिनर पैठण यांना ताब्यात घेतले आहे. अप्पर पोलीस अधिक्षक अन्नपुर्णा सिंह यांनी घटनास्थळी भेट दिली असुन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, बीट जमादार आप्पासाहेब माळी, पुढील तपास करीत आहेत.

# बीड कोंचिग क्लासमधील लैंगिक छळाप्रकरणी एसआयटी स्थापन करणार - मुख्यमंत्री

मुंबई, २ जुलै (हिं.स.) : बीड जिल्ह्यात खासगी कोचिंग क्लासेसमध्ये एका अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाची वरिष्ठ दर्जाच्या आयपीएस महिला अधिकार्यांच्या अध्यक्षतेखालील एसआयटी स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी(दि.१) विधानसभेत केली.तसेच या प्रकरणातील आरोपींना आणि त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करणार्यांना कठोर शिक्षा करण्यात येईल, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

विधानसभेत मंगळवारी(दि.१) राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनी बीड येथील लैंगिक अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीडमध्ये घडलेली घटना अतिशय गंभीर आहे. कोचिंग क्लासच्या माध्यमातून मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची घटना समोर आली असून त्यातील एका मुलीने आणि तिच्या आईने गुन्हा नोंदवल्याने याबद्दलची वस्तूस्थिती बाहेर आली. पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत तो गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यातील आरोपींना दोनच दिवसांची कोठडी का मागण्यात आली, यासंदर्भात चौकशी केली जाईल. या प्रकरणात राज्यात मोठ्या प्रमाणात रोष असून याची व्याप्ती अधिक असू शकते अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. एक मुलगी हिंमतीने समोर आली. पण आणखी अशा किती मुलींसोबत असा व्यवहार झाला, असा प्रश्नचिन्ह निर्माण होतो. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती आणि यातील संवेदनशीलता लक्षात घेता वरिष्ठ दर्जाच्या आयपीएस महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी तयार करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

एसआयटीच्या माध्यमातून या गुन्ह्याची चौकशी करण्यात येईल. या प्रकरणाची व्याप्ती कुठपर्यंत आहे? यामागे कुणाचा वरदहस्त आहे का? कुणी राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या वेगवेगळे वळण देत आहे का? या सगळ्याची चौकशी करण्यात येईल. तसेच या माध्यमातून आमच्या मुलींना योग्य न्याय मिळावा यादृष्टीने आम्ही प्रयत्न करू. टाईम बाऊंड पद्धतीने एसआयटी याची चौकशी करेल. याप्रकरणाचा पूर्ण छडा लावून अशा नराधमांना आणि त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वस्त केले.

# राज्यातील शाळांमध्ये कमी पटसंख्या असूनही शाळा बंद नाही - एकनाथ शिंदे

मुंबई, २ जुलै - राज्यातील काही भागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत असून, त्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. विद्यार्थी संख्या कमी झाली तरी कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. तसेच शासनाने कोणतीही शाळा बंद केली नसल्याची माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. विधानपरिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आणि राज्यमंत्री श्री. भोयर बोलत होते. यावेळी सदस्य जयंत आसगावकर, ज. मो. अभ्यंकर, अमोल मिटकरी, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

# शासकीय कार्यालयात 'बर्थडे केक' कापणाऱ्यावर होणार कारवाई

मुंबई, २ जुलै -शासकीय कार्यालयात आता अधिकारी, कर्मचाऱ्यांचा वाढदिवस साजरा करणे, केक कापणे, सेल्फी, फोटोसेशन करणे महागात पडणार आहे.याबाबत आता राज्य शासनाने कडक भूमिका घेत 'महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९'च्या अनुषंगाने परिपत्रक जारी केले आहे. कार्यालयीन वेळेत, कार्यालयीन जागेवर वैयक्तिक समारंभ घेणे, हा शिस्तभंग मानला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शासनाने जारी केलेल्या नियमानुसार, कोणताही सरकारी कर्मचारी कार्यालयीन वेळ आणि ठिकाणी अशासकीय, वैयक्तिक, धार्मिक वा सामाजिक कार्यक्रम आयोजित करू शकत नाही. नियम क्रमांक ४, ५ व २२ अंतर्गत कर्मचाऱ्यांकडून शिस्तबद्ध, पारदर्शक आणि लोकाभिमुख वर्तणूक अपेक्षित आहे.परिपत्रकानुसार या नियमांचे उल्लघंन केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांची प्रशासकीय चौकशी होऊ शकते. त्यानंतर समज देणे, लेखी तडकाफडकी तक्रार, पदोन्नती थांबवणे, निलंबन किंवा सेवासमाप्ती यांसारखी शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. शासनाने संबंधित विभागप्रमुखांना याबाबत कठोर सूचना दिल्या आहेत.

कार्यालयीन वेळेत 'सेलिब्रेशन'चा बेत आखला जातो. कामाच्या वेळेतच मोठ्या उत्साहात केक कापला जातो. कर्मचारी तासाभरासाठी काम बाजूला ठेवतात. काही ठिकाणी संगीत आणि मोबाइल व्हिडीओ शूटिंगही सुरू असते.यामुळे दैनिक भेटींसाठी आलेल्या नागरिकांच्या कामांना संबंधित कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा वाढदिवस सेलिब्रेशन खोळंबा ठरत आहे. त्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण होत आहे. शासनाने ठरवून दिलेली कार्यालयीन वेळ ही लोकसेवेसाठी आहे, वैयक्तिक सोहळ्यांसाठी नाही, याचे भान संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी ठेवण्याची गरज आहे.त्यामुळे राज्य शासनाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाराष्ट्र भूकमूक्त करण्यात वसंतराव नाईकांचे मोलाचे योगदान :डॉ.ढवण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
महाराष्ट्र भूकमूक्त करण्यात वसंतराव नाईकांचे मोलाचे योगदान आहे असे प्रतीपादन डॉ.ढवण यांनी केले.

कृषि महाविद्यालय लातूर, विलासराव देशमुख कृषि जैवतंज्ञान महाविद्यालय लातूर, सामाजिक वनीकरण विभाग लातूर व एडीएम अग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत कृषि सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने कृषि महाविद्यालयात वृक्षदिंडी काढून तसेच सप्ताहाचे उद्घाटन करुन कृषि दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे माजी कुलगुरु डॉ.अशोक ढवण, अध्यक्ष व उद्घाटक म्हणून तर अमितराज जाधव व सुनिल स्वामी हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते. तसेच डॉ.बाबासाहेब ठोंबरे, डॉ.अच्युत भरोसे, डॉ.व्यंकट जगताप, डॉ.मोहन धुपे व डॉ.अनिलकुमार कांबळे मंचावर उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक ढवण यांनी, हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांच्या जीवनाच्या विविध पैलूंवर सखोल प्रकाश टाकून मार्गदर्शन केले. ते पुढे असेही म्हणाले की स्व.वसंतराव नाईक हे मूळ हाडाचे शेतकरी होते तसेच त्यांनी महाराष्ट्र भूकमुक्त करुन रोजगार हमीचे जनक बनले. त्यांनी कामाची हमी व कामाच्या मोबदल्यात धान्य, कापूस एकाधिकार योजना अशा विविध योजना राबवून शेतीचा पाया मजबूत करुन शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन दिले.

यावेळी डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्यासह इतर आनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास दोन्ही महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, अधिकारी, कर्मचारी, एडीएम अग्रो इंडस्ट्रीज चे अधिकारी कर्मचारी तसेच विद्यार्थी व कृषिदूत आणि कृषिकन्या उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## मातोळ्यात लांडग्याने केली गायीची शिकार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
औसा तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून कोल्ह्याने दहशत निर्माण केली असून, रविवारी मातोळा येथील एका गायीची हिंस्त्र प्राण्याने शिकार केल्याचे आढळून आले. दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ट्रॅप कॅमेरे बसवून पाहणी केली असता, लांडग्याने हल्ला केल्याचे स्पष्ट झाले आहे.

औसा तालुक्यातील लखनगाव येथील एका गायीवर, हिप्परसोगा येथे दोन जनावरांवर आणि माळुंब्रा येथील एका गायीच्या वासरावर हिंस्त्र प्राण्याने हल्ला केल्याच्या घटना घडल्या. दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून ट्रॅप कॅमेरे बसविले होते. त्यात लखनगावातील घटनेचा उलगडा झाला नाही. मात्र, हिप्परसोगा आणि माळुंब्रा येथे कोल्ह्याने हल्ला केल्याचे स्पष्ट झाले. नागरसोगा येथेही बिबट्यासदृश्य प्राणी दिसल्याचे नागरिकांनी सांगितले. तेव्हा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्राण्याच्या पावलांचे ठसे घेतले. मात्र, ते बिबट्याच्या पावलांशी जुळत नसल्याचे वन परिमंडळ विभागाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, रविवारी रात्री मातोळा येथील विठ्ठल भोसले यांच्या गायीवर हिंस्त्र प्राण्याने हल्ला केल्याची घटना घडली. याची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करीत ट्रॅप कॅमेरे बसविले. त्यात लांडगा असल्याचे निदर्शनास आले आहे, असे वन परिमंडळ अधिकारी पांडुरंग चिल्ले यांनी सांगितले.

## कुणबी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
तालुक्यातील मुरुड येथील कुणबी मराठा परिवाराच्यावतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुणबी मराठा सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ कोळसुरे, माजी महापौर सुरेश पवार, अध्यक्ष अशोकराव कातळे, सचिव गोविंदराव हालसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी गुजरात येथील विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कुणबी मराठा समाजातील दहावी व बारावीत उत्तीर्ण झालेल्या चाळीस विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, फेटा, पुष्पहार, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानंतर व्यंकटराव गंगणे यांनी सर्वजण एकत्र येऊन गेल्या वर्षभरात काय कार्यक्रम राबवले, याची माहिती दिली. प्रा. सौदागर भिसे यांनी दहावी-बारावीनंतर काय करावे, तसेच अभ्यासावर कसा भर द्यावा व पालकांनी काय करावे, याविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन वैजिनाथ हराळे यांनी केले. आभार बालाजी धोत्रे यांनी मानले. या कार्यक्रमास दहावी व बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

## अशिहरा कराटे राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
लातूर जिल्हा कॉंग्रेस सेवादल, स्पोर्ट केम्पो महाराष्ट्र असोसिएशन व अशिहरा कराटे असोसिएशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अशिहरा कराटे व स्पोर्ट केम्पो राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा नळेगाव येथील ग्रामपंचायत सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत दीडशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवून आपले कौशल्य सादर केले.

अध्यक्षस्थानी सरपंच सूर्यकांत चव्हाण होते. उद्घाटन उपनिरीक्षक रमेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लातूर जिल्हा सेवादलाचे जिल्हाध्यक्ष अनिल चव्हाण, अलीमसाब तांबोळी, सचिव के. वाय. पटवेकर, सचिव संतोष तेलंगे, नामदेव शिंगडे, मारोती भुत्ते, दयानंद मानखेडे, अनिकेत शेंडगे, दिलीप मानखेडे, अमजद घोरवाडे, दाऊद बागवान, गुंडेराव मोरकांडे, प्रमोद हुडगे, संभाजी सेनेचे तालुकाध्यक्ष राजू शेलार, सुनील भोसले आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. स्पोर्ट केम्पो फाईट व कराटेतील काता, कुमिते या प्रमुख प्रकारांमध्ये खेळाडूंनी दमदार प्रदर्शन करून प्रेक्षकांची मने जिंकली. प्रस्ताविक के. वाय. पटवेकर, सूत्रसंचालन चेतन चव्हाण व प्रमोद हुडगे यांनी केले.

# असंख्य शेतकऱ्यांनी 'शक्तिपीठ'ची मोजणी रोखली



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
नागपूर-रत्नागिरी या नियोजीत व महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग लातूर जिल्ह्यातून जात आहे. मंगळवारी लातूर तालुक्यातील ढोकी (येळी) येथे प्रशासनाकडून महामार्गाची मोजणी करण्यात येणार होती. त्यासाठी लातूरच्या उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे या आपल्या टीमसह तिथे गेल्या. मात्र, ढोकी व परिसरातील अनेक गावांतून एकत्र आलेल्या आक्रमक शेतकऱ्यांनी मोजणीस तीव्र विरोध केल्याने प्रशासनाला मोजणी न करताच रिकाम्या हाताने परत फिरावे लागले.

शक्तिपीठ महामार्गात लातूर जिल्ह्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी जात आहेत. या नियोजित

### मोजणी करणारच : रोहिणी नऱ्हे

लातूर जिल्ह्यातून ज्या-ज्या गावांमधून शक्तिपीठ महामार्ग नियोजित आहे, अशा सर्व गावातील सर्व संबंधित शेतकऱ्यांना मोजणीच्या संदर्भात रितसर नोटीसा देण्यात आल्या आहेत.

त्यांना मोजणीच्या तारखाही दिल्या आहेत. त्या-त्या ठिकाणी जाऊन आम्ही मोजणी करणारच आहोत, अशी प्रतिक्रिया उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी दिली आहे. मात्र, ढोकी (येळी) या ठिकाणी शेतकऱ्यांनी आक्रमक होऊन तीव्र विरोध केल्याने आम्हाला तेथील मोजणी थांबवावी लागली, असेही त्यांनी मान्य केले.

महामार्गाची मोजणी करण्याची नोटीस लातूरच्या उपजिल्हाधिकारी नऱ्हे यांनी दिली होती. मंगळवारी ढोकी (येळी) या गावात मोजणीचा शुभारंभ निश्चित करण्यात आला होता.

मात्र, ढोकी व परिसरातील आक्रमक शेतकऱ्यांनी त्या ठिकाणी येऊन 'शक्तिपीठ महामार्ग रद्द करा', 'शेती वाचवा-देश वाचवा' असा मजकूर लिहिलेल्या टोप्या परिधान करून घोषणाबाजी सुरू केली. कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमच्या जमिनी या महामार्गासाठी देणार नाही. हा महामार्ग कायमसाठी रद्द करावा, आमच्या जमिनी बागायती असून, त्या मांजरा डावा व उजवा कालवा लाभ क्षेत्रात आहेत.

आमच्या कायम उपजिवीकेचे साधन शेती हेच आहे. या महामार्गात जाणाऱ्या जमिनी या सुपीक व पिकाऊ आहेत. याच महामार्गाच्या नियोजित जागेवर झाडांची संख्या मोठी आहे. या जमिनी ज्या भागातून जाणार आहेत, ते सर्व शेतकरी अल्प अथवा अत्यल्प भूधारक आहेत, अशा आशयाचे निवेदनही शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे यांना दिले. शेतकरी आक्रमक झाले असल्याचे पाहून मोजणी करण्यास गेलेल्या पथकाला अक्षरशः हात हालवत परतावे लागले.

लातूर जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्ग जाण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. मंगळवारी ढोकी येथे होणारी मोजणी शेतकऱ्यांनी रोखली. या आंदोलनात ढोकी व परिसरातील शेतकऱ्यांसह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते. यावेळी कसलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त होता.

## राजेवाडी पाटीवर रास्तारोको

### चाकूर घटनेतील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
चाकूरच्या तालुका भूमी अभिलेख कार्यालयातील घटनेतील अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे, या मागणीसाठी रेणापूर तालुका सकल मातंग समाज बांधवांच्यावतीने तालुक्यातील राजेवाडी पाटीवर सोमवारी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन दीड तास चालले. त्यामुळे लातूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

चाकूरच्या तालुका भूमी अभिलेख कार्यालयातील घटनेप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, तहसील व पोलीस प्रशासनाकडून कुठलीही कारवाई झाली नाही. त्यामुळे समाज बांधवांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेतील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच संबंधितांना शासकीय नोकरीतून बडतर्फ करण्यात यावे, या मागणीसाठी रेणापूर तालुका सकल मातंग समाज बांधवांच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. चाकूर घटनेतील संबंधितांवर कारवाई करण्यात येत नसल्याने यावेळी शासन व प्रशासनाबद्दल संताप व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात विपुल तपघाले, बाळासाहेब पटनुरे, सर्जे राव गायकवाड, भानुदास कुडके, सुनील सौदागर, महादू रसाळ, आनंद वैरागे, बंटी गायकवाड, राहुल क्षीरसागर, राम कसबे, नितीन डांगे यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते. यावेळी नायब तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर सदर आंदोलन थांबविण्यात आले.

## शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये संविधानिक मंडळाची स्थापना




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थी संविधानिक मंडळाची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. भार्गव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील होते. यावेळी प्राचार्य दत्ता घारगे, उपप्राचार्या शीला शेळके, वैशाली गिरवलकर, तेजस बाहेती, रहमत सय्यद आदी उपस्थित होते. स्कूल कॅप्टन म्हणून माईर सय्यद, वाइस कॅप्टन म्हणून क्षीतिज काळे, स्पोर्ट कॅप्टन प्रथमेश जाधवर, वाइस कॅप्टन करण शेळके आदींच्या निवडी करण्यात आल्या. आभार समन्वयिका निसा नायर यांनी केले. विजय जाधव यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून ओळख असणारे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची ११२वी जयंती मंगळवारी लातूर शहरासह जिल्ह्यातील विविध शासकीय-निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विविध पक्ष आणि संघटनांच्यावतीने साजरी करण्यात आली.

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील, डॉ. शीतल येरुळे, प्रा. के. आर. कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे, रत्नेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. गवई म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांनी शेती, उद्योग क्षेत्रामध्ये आमूलाग्र क्रांती घडवून आणली. आपला देश हा शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा असल्यामुळे त्यांनी शेतीला विशेष प्राधान्य दिले. आज त्यांच्या या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे शेती, उद्योग क्षेत्र विकसित झाले आहे. त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष कृती दैनंदिन व्यवहारात करावी, असे ते म्हणाले.

**महाराष्ट्र विद्यालय**


औसा तालुक्यातील किल्लारी येथील महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी मुख्यमंत्री, हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य श्रीकांत सोनवणे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून वसंतराव नाईक यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य सोनवणे यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. सूत्रसंचालन प्रकाश सुभेदार यांनी केले तर आभार गजानन तनशेट्टी यांनी मानले.

**कै. देशमुख महाविद्यालय**

तालुक्यातील बाभळगाव येथील कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात जयंतीनिमित्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस प्रा. संदिपान चेवले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. इंद्रजीत शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. यावेळी स्टाफ सचिव चंद्रकांत मोरे, डॉ. जयदेवी पवार, प्रा. शीतल खोत, डॉ. सुरेशकुमार कांबळे, प्रा. संतोष कल्याणकर, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, डॉ. मा. ना. गायकवाड, डॉ. अजित भांजी आदी उपस्थित होते.

## आमदार कराड यांच्या प्रयत्नातून लातूर-कळंब रस्त्याचे डांबरीकरण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील गायब झालेला लातूर ते कळंब हा राज्यमार्ग 'लातूर ग्रामीण'चे आमदार रमेश कराड यांच्या प्रयत्नामुळे खुला झाला असून, या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण होऊन वाहनधारकांना प्रवासासाठी सुरू झाल्याने कळंब रस्त्यावरील अनेक गावच्या नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार कराड यांचे आभार व्यक्त केले आहे.

येथील जुन्या एमआयडीसी परिसरातून जाणारा लातूर ते कळंब २३६ हा राज्यमार्ग एमआयडीसी सुरू होण्यापूर्वी अस्तित्वात होता. एमआयडीसी अस्तित्वात आल्यानंतर उद्योजकांना जागेचे वाटप झाल्यानंतर हा रस्ता गायब झाल्याने वाहनधारकांना एमआयडीसीतील विविध पर्यायी रस्त्यांचा आधार घेऊन प्रवास करावा लागत होता. कळंब रस्त्यावरील दूरवरचा प्रवास करणाऱ्यांसह लातूर तालुक्यातील विविध गावच्या नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन आमदार रमेश कराड यांनी एमआयडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन लोप पावलेला हा रस्ता खुला करून घेण्याच्या आणि रस्त्याचे काम करण्याच्या सूचना केल्या होत्या. या सूचनेनुसार एमआयडीसीकडून नाहरकत घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पीव्हीआर चौक ते टिना ऑइल मिल चौक आणि पुढे कीर्ती ऑइल मिल चौक दरम्यानच्या रस्त्याची सरळ जोडणी करून या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण केले.

आ. कराड यांनी लातूर-कळंब रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून रस्त्यावरील विविध गावच्या वाहनधारकांना दळणवळणाची सोय सुरळीत करून दिल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, आ. कराड यांनी लातूर-कळंब रस्त्यावर असलेल्या रेल्वे क्रॉसिंगवर सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून पूल मंजूर करून त्यासाठी निधीही उपलब्ध करून घेतला असून, सदर पुलाची टेंडर प्रक्रिया सुरू आहे.

## कारसह १२ लाखांचा गुटखा जप्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ जुलै -**
उदगीर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने सोमवारी रात्री तालुक्यातील शिरोळ - जानापूर रोडवरील दुर्गा देवी तांडा शिवारातून एका कारसह ११ लाख ९३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीस अटक करून चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कठोर कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. सोमवारी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकास महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटख्याची अवैध विक्री करण्यासाठी शिरोळ जानापूर गावाच्या शिवारातून वाहतूक करण्यात येणार आहे, अशी माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनात पथक रात्री आठ वाजेच्या सुमारास शिरोळ - जानापूर जाणाऱ्या रोडवर दुर्गा देवी तांडा शिवारात रोडवर सापळा लावून प्रतिबंधित ४ लाख ९३ हजार ८६० रुपयांचा गुटखा आणि एक इटॉस कंपनीची कार (एम.एच.२४ ए यु ३५७७) असा एकूण ११ लाख ९३ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी गोपाळ बंडू केसाळे (रा. वांजरवाडा, ता. जळकोट) याला अटक करण्यात आली असून, फरार आरोपी विनायक महादेव गौंड, नागेश अंभाजी दुरनाळे आणि माधव मोरे (रा. जांब, ता. मुखेड) यांचा पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी वरील चौघांविरुध्द उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात उदगीर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार राम बनसोडे, राहुल नागरगोजे, संतोष शिंदे, नामदेव चेवले, राजकुमार डबेटवार, सचिन नाडागुडे यांनी ही सेवा बजावली.

# बिडकीन येथे चारचाकी- दुचाकी अपघात एकाचा मृत्यू, एक गंभीर



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २ जुलै - पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दिल्ली मुंबई औद्योगिक वसाहतीत चार चाकी व दुचाकी मध्ये झालेल्या अपघातातील जखमी पैकी एकाचा मृत्यू झाला तर एकावर संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.दिल्ली मुंबई औद्योगिक वसाहतीतील सेक्टर क्रमांक १० मध्ये दि १ जुलै रोजी दुपारी दोन वाजता चारचाकी एम.एच.२० जिक्यु १७४३ व दुचाकी एम.एच.२० डि झेल ५८९१ यांचा अपघात झाला. या अपघातात मुरलीधर जगन्नाथ डोळस (४५) सौरभ अर्जुन सोकटकर (१९) ( दोघेही रा बिडकीन)हे दोघे गंभीर जखमी झाले होते त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले आसता यातील मुरलीधर डोळस यांचे उपचारादरम्यान रात्री निधन झाले तर सौरभ सोकटकर यांच्यावर उपचार सुरू आहे. या प्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप धनेधर करीत आहेत.

## ओएबी जीवनमान लक्षणीयरीत्या खराब करू शकते- डॉ. गुल्हाणे

पुणे - अतिक्रियाशील मूत्राशय (ओएबी), ही एक किरकोळ गैरसोय म्हणून दुर्लक्षित केलेली स्थिती आहे, जी भारतात वेगाने एक महत्त्वाची आरोग्य चिंता बनत आहे, जी प्रौढ लोकसंख्येच्या १०% पेक्षा जास्त लोकांना प्रभावित करते. अचानक, अनियंत्रित लघवीची इच्छा, वारंवार लघवी होणे, रात्री लघवी होणे आणि कधीकधी असंयम यामुळे ओएबी केवळ दैनंदिन कामांमध्ये व्यत्यय आणत नाही तर भावनिक आणि मानसिक आरोग्यावरही खोलवर परिणाम करते. डॉक्टर आणि संशोधक आता ओएबी समजून घेण्याच्या आणि त्यावर उपचार करण्याच्या पद्धतीत बदल करण्याची वकिली करत आहेत. येल मेडिसिन आणि पेन मेडिसिन सारख्या संस्थांकडून मिळालेल्या नवीनतम युरोपियन असोसिएशन ऑफ युरोलॉजी मार्गदर्शक तत्त्वे आणि क्लिनिकल अंतर्दृष्टी पुष्टी करतात की ओएबी ही एक बहुआयामी स्थिती आहे - कधीकधी एक वेगळी मूत्राशय बिघडलेली समस्या, आणि कधीकधी सखोल न्यूरोलॉजिकल किंवा युरोलॉजिकल स्थितीचे लक्षण. पुण्यातील डॉ. गुल्हाणेज युरोलॉजी अँड डेंटल क्लिनिकचे मुख्य युरोलॉजिस्ट डॉ. पराग गुल्हाणे म्हणाले, अनेक रुग्ण वर्षानुवर्षे शांतपणे सहन करतात, त्यांना वाटते की त्यांची लक्षणे वृद्धत्वाचा किंवा तणावाचा एक नैसर्गिक भाग आहेत. पण ओएबी जीवनमान लक्षणीयरीत्या खराब करू शकते, ज्यामुळे झोपेचा त्रास, चिंता आणि सामाजिक अलगाव होऊ शकतो. आपण आता जे पाहत आहोत ते या स्थितीला तोंड देण्याच्या पद्धतीत एक स्वागतार्ह विकास आहे - आधुनिक औषध चांगले समज आणि अधिक प्रभावी, रुग्ण-अनुकूल उपचार पर्याय दोन्ही देते.

## वेस्ट झोन बिलिम्पिक्स कौशल्य स्पर्धा आणि सार्थकच्या १७व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याचे मुंबईत आयोजन

मुंबई - भारताची आर्थिक राजधानी आणि महत्त्वाकांक्षा आणि वैविध्याला चालना देणारे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत ४ आणि ५ जुलै २०२५ रोजी 'वेस्ट झोन रिजनल बिलिम्पिक्स आणि सार्थकचा १७वा वर्धापन दिन' हा देशातील एक सर्वात प्रभावी समावेशक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री श्री रामदास आठवले आहेत तसेच हा कार्यक्रम मुंबईतील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल बिलिम्पिक असोसिएशन ऑफ इंडिया (एनएएआय) आणि सार्थक एज्युकेशनल ट्रस्ट यांनी केले आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभाग, भारत सरकार, टीपीसीडीटी आणि इंडसइंड बँक यांचे या उपक्रमाला पाठबळ लाभले आहे. फिनलंडमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या ११व्या आंतरराष्ट्रीय बिलिम्पिक्स स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर भारतात सुरू असलेल्या मोहिमेचा हा एक भाग आहे. दक्षिण विभागातील चेन्नई येथील यशस्वी आयोजनानंतर मुंबईतील हा कार्यक्रम 'बिलिम्पिक्स कौशल्य स्पर्धा व परिषदा २०२५' या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील दुसरा टप्पा ठरणार आहे. या सोबतच दिव्यांग व्यक्तींचा कौशल्यविकास, रोजगार आणि समावेशाच्या माध्यमातून सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या 'सार्थक' या संस्थेच्या १७ वर्षांच्या वाटचालीचाही हा गौरव सोहळा आहे.

## बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये डॉक्टर दिन उत्साहात साजरा




बिडकीन दि २ जुलै - पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल येथे १ जुलै हा दिवस राष्ट्रीय डॉक्टर दिन म्हणुन साजरा करन्यात आला. हा दिवस डॉक्टरांच्या अतुलनीय सेवेला सलाम करण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी समर्पित आहे, याच अनुशंगाने आज शाळेमध्ये मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा केला. शाळेचे संस्थापक , अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कोविड काळातील डॉक्टरांचे योगदानावर शाळेतील इयत्ता सातविच्या विद्यार्थ्यांनी भाषणे व नृत्य सादर केले. शाळेतील शिक्षक ज्ञानेश्वर चव्हाण व इतर सर्वांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडन्यासाठी परिश्रम घेतले.

# विद्यादीप बालसुधार गृह व जिल्हा बाल कल्याण समिति बरखास्त करून उच्चस्तरीय चौकशी करण्याची सकल हिंदू समाजाची मागणी

### महिलांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



छत्रपती संभाजीनगर - ३० जून रोजी विद्यादीप बाल सुधार गृहातील नऊ मुलींच्या पलायन प्रकरणी आज रोजी शहरातील सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना निवेदन देण्यात आले. घटनेतील गंभीर्यता लक्षात घेऊन बाल कल्याण समिति बरखास्त करावी, आरोपींवर गुन्हे दाखल करावे आणि प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. उपस्थित महिलांनी घोषणाबाजी करत घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला.

निवेदनाच्या माध्यमातून केलेल्या मागणीनुसार या बाल सुधार गृहातून नऊ अल्पवयीन मुली आपल्यावर होत असलेल्या छळाला कंटाळून त्यांनी पलायन केले व न्याय मिळवण्यासाठी थेट न्यायालय गाठले. तिथे त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय बाल सुधार गृहात होत असून मानसिक छळ केला जातो, आम्हाला आवश्यक सोयी सुविधा दिल्या जात नाही, कोणत्याही कारणावरून मारहाण केली जाते, राहण्याच्या खोल्यांमध्ये सिसिटीव्ही कॅमेरे लावले आहेत, धर्मांतरण करण्यासाठी दबाव आणला जातो, जादूटोणा केलेले पाणी प्यायला दिले जाते असे अनेक गंभीर आरोप पीडित मुलींनी बालसुधार गृहावर केले आहे. पीडित मुलींना पोलिस प्रशासनाकडून छावणी पोलिस स्टेशन येथे हजर केले. अश्या परिस्थितीत आश्चर्याची बाब म्हणजे पोलिस प्रशासनाने पीडित मुलींची बाजू नीट ऐकून न घेता प्रकरणात तथ्य नसल्याचे सांगत बाल सुधार गृह समिति व पदाधिकारींना क्लीनचिट दिली आहे. ज्या बाल सुधार गृहातून पीडित मुली जीव वाचवून पळून गेल्या, पोलिसांनी पुन्हा त्यांना त्याच ठिकाणी आणून सोडले. अश्या परिस्थितीत पीडित मुलींनी न्यायासाठी कोणाकडे पहायचे? हा पीडित मुलींवरील अन्याय आहे. ज्या अर्थी त्यांनी बाल सुधार गृहातून पळून जाऊन न्याय मागण्याचे धाडस दाखवले आहे त्या अर्थी त्यांच्यावरील अन्यायाची गंभीर्यता लक्षात घेतली पाहिजे. पीडित मुलींच्या राहत्या खोल्यांमध्ये सिसिटीव्ही लावणे त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन असून त्या व्हिडिओ फुटेजचा गैरवापर सुद्धा होऊ शकतो. त्यामुळे सिसिटीव्ही मधील व्हिडिओ डेटा आपल्या ताब्यात घेऊन सुरक्षित जतन करावा आणि लवकरात लवकर जिल्हा बालकल्याण समिती, बाल सुधार गृह समिति सदस्य, पदाधिकारी यांना बरखास्त करून एक उच्चस्तरीय समिती नेमून सखोल चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

# मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली राज्यात अधिक मजबूतीने काम करून मोठे यश मिळवेल : ना राधाकृष्ण विखे पाटील



अ. नगर : विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकासित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भारतीय जनता पक्ष अधिक मजबूतीने काम करून मोठे यश मिळवेल असा विश्वास जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावर आ.रविंद्र चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी अभिनंदन करून, शुभेच्छा दिल्या आहेत. आ.रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून संघटनात्मक अनुभव असलेले नेतृत्व प्रदेशाध्यक्ष पदावर विराजमान झाल्याने कार्यकर्ते आणि पदाधिका-यां मध्ये मोठा उत्साह असल्याचे त्यांनी सांगितले.

आ.रविंद्र चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. कल्याण डोंबीवली महानगर पालिका आणि डोबिवली विधानसभा मतदार संघाचे पहिले आमदार म्हणून त्यांनी विजयाची घोडदौड सुरु केली. सलग चार वेळा या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व ते करीत आहेत. सार्वजनिक जीवनात विकास कामांच्या प्रक्रीयेला पुढे जाण्याचा मोठा अनुभव तसेच एक कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष अशी त्यांची राहीलेली संघटनात्मक वाटचाल सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

महायुती सरकारमध्ये विविध मंत्री पदांचा कार्यभार सांभाळताना त्यांनी नागरी हिताचे निर्णय घेतले. यामध्ये प्राधान्याने राज्यातील रस्ते विकासामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण राहीले. सरकार आणि संघटना यातील योग्य समन्वय साधण्याचा अनुभव आ.रविंद्र चव्हाण यांच्या पाठीशी असल्याने राज्यात भाजपाच्या संघटनात्मक कामाला त्यांचे बहुमोल असे मार्गदर्शन निश्चित उपयुक्त ठरेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य करीत असलेल्या विकासात्मक वाटचालीला संघटनेच्या माध्यमातून भक्कम असे पाठबळ उभे करून आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही विधानसभे प्रमाणेच भारतीय जनता पक्ष प्रथम स्थानावर यश मिळवेल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

# पैठणच्या संतपीठासाठी निधी देण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२ :- पैठणच्या दक्षिण काशीत महाराष्ट्र शासनाने मराठवाड्याच्या विकासाच्या ४२ कलमार्तगत संतपीठ उभा करण्याची घोषणा करून जवळपास ३५ वर्षपेक्षा जास्त काळ लोटला आहे. संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील जागेत संतपीठ सर्व सुविधा युक्त १७ एकर जागेत पुर्ण क्षमतेने उभा करण्यासाठी ची कार्यवाही अतिशय मंद गतीने चालू आहे. संतपीठ त्वरित सुरू करण्यात यावे म्हणून मागील काही वर्षांत वारकरी संघटनेसह सामाजिक संघटनांनी आंदोलने केली आहेत. त्यामुळे सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली संतपीठाचे प्राथमिक कामकाज प्रशासकीय इमारतीतून सुरू केले आहे. सद्यस्थितीत संत परिचय हा एकमेव अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. कै.थोर साहित्यिक बाळासाहेब भारदे समितीने संतपीठाच्या अभ्यासक्रमाबाबत सविस्तर अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. संतपीठासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणीही विद्यापीठाकडून करण्यात आलेली आहे. त्याचीही शासनाने गंभीर दखल घ्यावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने ही संतपीठाच्या सर्व इमारती बांधकामासाठी निधीची मागणी केली आहे. मात्र आजही पैठणच्या संतपीठाच्या विकासाचे रणगाडे भिजत पडले आहे.

महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे आराध्य दैवत पांडुरंगाचा आषाढी महोत्सव साजरा करण्यासाठी संत-महंत व वारकरी येत्या दि.६ रविवारी पंढरपूर क्षेत्री लाखोंच्या संख्येने जमणार आहेत. या शुभ पर्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पैठणच्या संतपीठ उभारणीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा करावी अशी मागणी वारकऱ्यांनी केली आहे.



सोयगाव – महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित भाजपा प्रदेशाध्यक्ष,आमदार रवींद्र दादा चव्हाण यांनी पदभार स्वीकारला,त्या निमित्ताने त्यांना शुभेच्छा देऊन भेट घेतली. याप्रसंगी भाजपाचे अल्पसंख्यांक प्रदेश अध्यक्ष इद्रिसभाऊ मुलतानी,भाजपा नेते सुनिल गावंडे,सोयगाव मंडळाध्यक्ष संजय पाटील,सुरज कवाल उपस्थित होते.

# जैनांचे २२ वे तिर्थंकर भगवान नेमीनाथ यांचा मोक्ष कल्याणक निर्वाण लाडु राजाबजार जैन मंदिरात संपन्न

### अष्टानिका पर्वा निमीत्त सिध्दचक्र महार्चना महोस्तवाचे ३ जुलै ते १० जुलै आयोजन



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर येथे २०२५ चातुर्मास निमीत्त आचार्य प्रणामसागरजी महाराज वास्तव्यास असुन त्यांच्या सानिध्यात विविध धार्मिक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले असुन आज जैनांचे २२ वे तिर्थंकर भगवान नेमीनाथ यांचा मोक्ष कल्याणक निमीत्त आज सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. तदनंतर निर्वाण कांडचे वाचन करैन भगवंताला दिलीपकुमार रोहितकुमार पाटणी परिवाराच्या वतीने निर्वाण लाडु चढविण्यात आला.

यावेळी शांतीमंत्राचे पठण आचार्य प्रणामसागरजी महाराज यांनी केले. तदनंतर आचार्यश्रींनी नेमीनाथ भगवंतावर आपले उदबोधन केले. यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, चंदा कासलीवाल, संतोष सेठी महावीर ठोले , किरण पहाडे, निता ठोले, ललीत पाटणी, अशोक गगवाल प्रमोद पाडे अनुप पाटनी वर्धमान पांडे, अनिला ठोले, ताराबाई कासलीवाल, बापु कासलीवाल, समिर ठोले, सुरेखा पाटणी, सुनिता पाटणी, जयश्री गंगवाल, निर्मल पांडे, भिकचंद लोहाडे, सतिश ठोले, प्रकाश कासलीवाल, शांतीलाल पाटणी, शिरीष पाटणी, रविंद्र सेठी, डॉ.शैलेश चांदीवाल, महावीर काला, कांताबाई पहाडे, राजाभाउै पहाडे, रिना ठोले,सपना पापडीवाल, भरत पापडीवाल यांच्यासह समाज बांधवांची मोठी उपस्थिती होती तसेच दिनांक ३ जुलै ते १० जुलै पर्यत श्री.हिराचंद कस्तुरचंद कासलीवाल प्रांगण येथे आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या ससंघ सानिध्यात संगीतमय अष्टानिका पर्वा निमीत्त सिध्द चत्रै महाआर्चना महोस्तवाचे आयोजन करण्यात आले असुन यावेळी सौधर्म इंद्र म्हणुन सौ.संगीता विजयकुमार सेठी, कुबेर इंद्र म्हणुन सौ.वंदना विनोदकुमार कासलीवाल, यज्ञ नायक म्हणुन सौ.हेमलता इंदरचंद चुडीवाल, ईशान इंद्र म्हणुन सौ.सरीता रविंद्र कासलीवाल, सनदकुमार इंद्र म्हणुन सौ.अलका विलास कासलीवाल, महेंद्र इंद्र म्हणुन सौ.प्रतिभा जयचंद प्रितम नितीन कासलीवाल परिवार हे लाभले आहे. तसेच श्रीफळसाठी विजयकुमार जितेंद्रकुमार नविनकुमार नितीनकुमार पाटणी परिवार यांचे योगदान मिळाले आहे.

संपुर्ण कार्यकम हा हिराकाका प्रांगण आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव सभागृह नवाबपुरा येथे होणार आहे. तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन खंडेलवाल दिंगबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार अंतर्गत श्री.भक्तांबर प्रभावना चातुर्मास समिती २०२५ यांनी केली आहे.

---

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०१-०७-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **शाहीन कमरुद्दीन शेख** यांनी मोहल्ला **अनुसयानगर** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१५१७** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : मिळकत नं. १५१८** **पश्चिम : मिळकत नं. १५१६**
**दक्षिण : मिळकत नं. १८२८** **उत्तर : ६ मिटरचा रस्ता**

आकार : पूर्व पश्चिम **६७८.८४ चौ.फु.** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०१/२०२५

१/- वसंत रामलाल चौधरी, वय ५५ वर्ष, धंदा शेती, रा. बनोटी, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- निर्मलाबाई भगवान सुरळे (चौधरी), वय ६१ वर्ष, धंदा घरकाम रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अड. सचिन सु. गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत तुळसाबाई रामलाल चौधरी (सुरळे) यांचा दिनांक १९.०९.२०२३ रोजी मौजे बनोटी, ता. सोयगाव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत तुळसाबाई रामलाल चौधरी (सुरळे) यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २/७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ७/८/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा.अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २००/२०२५

१/- पोपट डोंगरसिंग निकम, वय ४६ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. नगरदेवळा, ता. पाचौरा, जिल्हा जळगाव, ह मु. आडगाव, नाशिक, तालुका व जिल्हा नाशिक. २/- आशा उर्फ गौतमबाई डोंगरसिंग निकम, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. नगरदेवळा, ता. पाचोरा, जिल्हा जळगाव.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळवण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाटी अड. सचिन सु.. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत चंद्रकलाबाई डोंगरसिंग निकम यांचा दिनांक २५.१२.२०२३ रोजी मौजे उप्पलखेडा, ता. सोयगाव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत चंद्रकलाबाई डोंगरसिंग निकम यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २/७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ७/८/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा.अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

## पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव

नोंदणी क्र.जे.जी.ए./जे.जी.ए./आर.एस.आर./सी.आर./२२१/२१०/२००० दि.१८/१०/२०००
नोंदणीकृत पत्ता : अरुणाई संकुल, कोर्टा समोर, अमळनेर ता.अमळनेर जि. जळगांव
संपर्क: पत्ता : ७१, युनिटी चेंबर्स, गणेश कॉलनी रोड, जळगांव फोन : ०२५७-२२५५७६३

(पहा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील नियम १०७ उपनियम (११) (ड-१)
नमुना झेड

### स्थावर मिळकतीचे सांकेतीक ताब्याची सुचना

मी खाली सही करणार पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगाव, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेशान्वये नियुक्त विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेकडून तमाम संबंधित व्यक्तींना कळिवणेत येते कि, पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगाव चे कर्जदार / थकबाकीदार (१) कर्जदार / थकबाकीदार रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल, हल्ली मु.रा. फ्लॅट न. १० प्लॉट नं. २, व्हिला नं ६७ जवळ, स्वप्नपूर्ती हाइट्स, इटखेडा परिसर, पैठण रोड, छ. संभाजीनगर. (२) जामीनदार/संबंधित मिळकतधारक ऋणको राजू बाबुराव डोळे, रा.लक्ष्मी अपार्टमेंट, प्लॉट न.४ टेलिफोन ऑफिसजवळ, छ. संभाजीनगर, व (३) नितीन अशोक पेडगावकर हल्ली मु. प्लॉट नं १९, क पारिजात कॉ. सोसा.एन-४ सिडको,छ.संभाजीनगर जामीनदार/ऋणको यांना दि.१७/०५/२०२३ रोजी चे जप्ती आदेश व नोटीसीने कर्ज थकबाकी रक्कम रु.३,६३,७२,३४४/- अक्षरी तीन कोटी त्रेसष्ट लाख बहात्तर हजार तीनशे चौरेचाळीस मात्र + त्यावर होणारे पुढील व्याज + वसुली खर्च इतकी रक्कम उपर्युक्त नमूद पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था यांचेकडील संबंधित कर्जखाती नोटीस मिळण्यापासून १५ दिवसांचे आत भरणा करून कर्जप्रकरण निरंक करणेविषयी कळिवले होते. तथापि सदरील नोटीस उपरुक्त कर्जदार/जामीनदार / ऋणको/मिळकतधारक यांना प्राप्त होऊनही त्यांनी आजतागायत सदरील कर्जखाती कोणतीही रक्कम अदा केली नाही त्यामुळे उपर्युक्त कर्ज थकबाकी रकमेचे वसुलीकामी सदरील मिळकत जाहीर लिलावाने विक्री करणे क्रमप्राप्त झाले असून त्यामुळे सदरील कर्ज वसुली कामी संस्थेचे वसुली अधिकारी यांनी खालील नमूद केलेली व उपर्युक्त नमूद केलेल्या दिनांकाच्या आदेशान्वये जप्त केलेली स्थावर मालमत्ता मिळकत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) नुसार मला असलेल्या अधिकारांचा वापर करून सदरील मिळकत आज दि.०२/०७/२०२५ रोजी ताब्यात घेतली असून विशेषतः उपर्युक्त कर्जदार व मिळकतधारक व त्रयस्थ इसम संबंधित मिळकतीचे जप्ती आदेशानंतर संपूर्ण तमाम जनतेस कळिवणेत येते कि, सदरील मिळकती संदर्भाने कर्जदार अगर मिळकतधारक यांच्याशी कोणी कोणताही व्यवहार केल्यास तो अर्जदार/धनको पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या., शिरसोली, जळगावचे उपर्युक्त नमूद केलेल्या थकीत कर्ज रकमेचे वसुलीचे अधीन राहील.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे देवळाई गट नं. ७८, छ.संभाजी नगर (औरंगाबाद) येथील स्थावर मिळकत क्षेत्र.० हे.२९.८९ आर. राजु बाबुराव डोळे यांचे हिस्याची.

दिनांक व ठिकाण
छ.संभाजी नगर (औरंगाबाद)
दिनांक : ०२/०७/२०२५

सतिष के वाघमारे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव
महा.सह.संस्था अधिनियम १९६० चे
कलम १५६ व नियम १०७ अन्वये

---

## पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव

नोंदणी क्र.जे.जी.ए./जे.जी.ए./आर.एस.आर./सी.आर./२२१/२१०/२००० दि.१८/१०/२०००
नोंदणीकृत पत्ता : अरुणाई संकुल, कोर्टा समोर, अमळनेर ता.अमळनेर जि. जळगांव
संपर्क: पत्ता : ७१, युनिटी चेंबर्स, गणेश कॉलनी रोड, जळगांव फोन : ०२५७-२२५५७६३

(पहा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील नियम १०७ उपनियम (११) (ड-१)
नमुना झेड

### स्थावर मिळकतीचे सांकेतीक ताब्याची सुचना

मी खाली सही करणार पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगाव, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेशान्वये नियुक्त विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेकडून तमाम संबंधित व्यक्तींना कळिवणेत येते कि, पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरसोली, जळगाव चे कर्जदार / थकबाकीदार (१) कर्जदार / थकबाकीदार रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल, हल्ली मु.रा. फ्लॅट न. १० प्लॉट नं. २, व्हिला नं ६७ जवळ, स्वप्नपूर्ती हाइट्स, इटखेडा परिसर, पैठण रोड, छ. संभाजीनगर. (२) जामीनदार/संबंधित मिळकतधारक ऋणको राजू बाबुराव डोळे, रा.लक्ष्मी अपार्टमेंट, प्लॉट न.४ टेलिफोन ऑफिसजवळ, छ. संभाजीनगर, व (३) नितीन अशोक पेडगावकर हल्ली मु. प्लॉट नं १९, क पारिजात कॉ. सोसा.एन-४ सिडको,छ.संभाजीनगर जामीनदार/ऋणको यांना दि.१८/०१/२०१८ तसेच दि.१६/०६/२०२२ तसेच दि.१७/०५/२०२३ रोजी चे जप्ती आदेश व नोटीसीने कर्ज थकबाकी रक्कम रु.३,६३,७२,३४४/- अक्षरी तीन कोटी त्रेसष्ट लाख बहात्तर हजार तीनशे चौरेचाळीस मात्र + त्यावर होणारे पुढील व्याज + वसुली खर्च इतकी रक्कम उपर्युक्त नमूद पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था यांचेकडील संबंधित कर्जखाती नोटीस मिळण्यापासून १५ दिवसांचे आत भरणा करून कर्जप्रकरण निरंक करणेविषयी कळिवले होते. तथापि सदरील नोटीस उपरुक्त कर्जदार/जामीनदार / ऋणको/मिळकतधारक यांना प्राप्त होऊनही त्यांनी आजतागायत सदरील कर्जखाती कोणतीही रक्कम अदा केली नाही त्यामुळे उपर्युक्त कर्ज थकबाकी रकमेचे वसुलीकामी सदरील मिळकत जाहीर लिलावाने विक्री करणे क्रमप्राप्त झाले असून त्यामुळे सदरील कर्ज वसुली कामी संस्थेचे वसुली अधिकारी यांनी खालील नमूद केलेली व उपर्युक्त नमूद केलेल्या दिनांकाच्या आदेशान्वये जप्त केलेली स्थावर मालमत्ता मिळकत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) नुसार मला असलेल्या अधिकारांचा वापर करून सदरील मिळकत आज दि.०२/०७/२०२५ रोजी ताब्यात घेतली असून विशेषतः उपर्युक्त कर्जदार व मिळकतधारक व त्रयस्थ इसम संबंधित मिळकतीचे जप्ती आदेशानंतर चे खरेदीदार बालाजी रवींद्रनाथ केवारे यांना व संपूर्ण तमाम जनतेस कळिवणेत येते कि, सदरील मिळकती संदर्भाने कर्जदार अगर मिळकतधारक यांच्याशी कोणी कोणताही व्यवहार केल्यास तो अर्जदार/धनको पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या., शिरसोली, जळगावचे उपर्युक्त नमूद केलेल्या थकीत कर्ज रकमेचे वसुलीचे अधीन राहील.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे घारदोन ता.जि.छ.संभाजी नगर (औरंगाबाद) येथील मिळकत गट क्र.१६३ क्षेत्र.० हे.८१ आर.

दिनांक व ठिकाण
छ.संभाजी नगर (औरंगाबाद)
दिनांक : ०२/०७/२०२५

सतिष के वाघमारे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव
महा.सह.संस्था अधिनियम १९६० चे
कलम १५६ व नियम १०७ अन्वये

अग्रलेख...

# श्रीमंतांच्या स्थलांतराचा अन्वयार्थ

या बातम्या तशा अधूनमधून येतात, पण अस्वस्थ करून जातात. त्या असतात छोट्याशा, पण चिंता वाढविणाऱ्या असतात. गेल्या काही वर्षांत भारत सोडून विदेशात स्थायिक होणाऱ्यांची संख्या वाढते आहे आणि त्यांत श्रीमंत वा अतिश्रीमंतांची संख्या सर्वाधिक आहे, हे अनेकांच्या वाचनात आले असेल. तसे हे आताच सुरू झालेले नाही. स्वातंत्र्यापूर्वी आणि त्यानंतरही अनेकांनी भारत सोडला आणि इतर प्रगत देशांत जाऊन राहणे पसंत केले. आता त्यांचे प्रमाण वाढते आहे आणि म्हणूनच त्याची चर्चा सुरू झाली आहे. मध्यंतरी एक सर्वेक्षण झाले होते. त्यात असे आढळून आले होते की, भारतातील २२ टक्के अतिश्रीमंतांना देश सोडून कुठे तरी विदेशात स्थायिक व्हायचे आहे. भारताच्या तुलनेत प्रगत देशांमध्ये चांगले व उजवे जीवनमान, आरोग्यसेवा व शिक्षणाच्या सोयी, व्यावसायिक व व्यवसायांप्रति संवेदनशील असलेली व्यवस्था आहे आणि त्यामुळेच आम्हाला तिकडे जावेसे वाटते, असे या अतिश्रीमंतांचे म्हणणे. दरवर्षी हजारोंच्या संख्येत श्रीमंत आणि अतिश्रीमंत लोक भारत सोडून जात आहेतच. एकेकाळी भारतातून बुद्धिमान लोक विदेशात जाण्याचा ट्रेंड आला होता. त्याला ब्रेन ड्रेन म्हटले जाते. तो अद्याप पुरेसा थांबलेला नाही. आताही अनेक बुद्धिमान लोक युरोप-अमेरिकेत स्वतःचे भविष्य शोधतात. त्यातच श्रीमंतांच्या व अतिश्रीमंतांच्या स्थलांतरामुळे भारताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळेच त्याकडे गांभीर्याने पाहण्याची व ते रोखण्याची आवश्यकता आहे.

भारताची अर्थकारणातील प्रगती, वाढते सकल राष्ट्रीय उत्पन्न, गरिबीत झालेली लक्षणीय घट या पृष्ठभूमीवर स्थलांतराचे आकडे आणि इच्छा या बाबी अधिक अस्वस्थ करणाऱ्या ठरतात. विविध संस्थांनी यासंदर्भात सर्वेक्षणे केली, अभ्यास केले. त्यांना असे आढळून आले की, अशा स्थलांतरित होत असलेल्या वा होऊ पाहणाऱ्या लोकांच्या मते भारतात काही फार मोठा अभाव आहे असे नव्हे. परंतु, भारतातील विद्यमान क्षमता व व्यवस्था त्यांच्या अपेक्षेनुसार पुरेशी नाही. अनेकांना असे वाटते की, त्यांनी व्यवसाय उभारले-चालविले, समृद्धी निर्माण केली, असंख्य लोकांना रोजगार दिला, कर भरले आणि तरीही व्यवस्थेने अनेकदा छोट्याशा कारणास्तव त्यांना मदत करण्याऐवजी अडचणीत आणले. त्यातले सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे लालफितशाही व नोकरशाहीचा अतिरेक आणि नियमांमधील संदिग्धता. शिवाय, मोठ्या शहरांमध्ये पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण आलेला आहे. सामाजिक सौहार्दाला नख लागेल अशा घटना सतत घडत असतात. आणखी एका गोष्टीकडे ही मंडळी लक्ष वेधतात आणि ती अशी की, भारतातील न्यायदान प्रक्रिया ही अतिशय संथ आणि न्याय मागू पाहणाऱ्याचा अंत पाहणारी आहे. आता मोठ्या शहरांमध्ये मोठाल्या फ्लॅट स्किम्स उभारल्या गेलेल्या आहेत. एकेक फ्लॅट चार-पाच हजार चौरस फुटांचा किंवा त्याहूनही मोठा. अशा फ्लॅट स्किम्सना मोठे गेट्स असतात. त्यामुळे त्यांना गेटेड कम्युनिटीज म्हणतात. बंगल्यांमध्येही श्रीमंत किंवा अतिश्रीमंत लोक राहतात. हे असे 'प्रोटेक्टेड' लोक घरात असतात तोवर त्यांना शहरातील गोंधळापासून तितक्यापुरता दिलासा मिळतो. पण, बाहेर पडल्याबरोबर प्रदूषण, ठिकठिकाणचे उकिरडे, अस्वच्छता, अतिक्रमणे आणि अन्य समस्याच समस्या दिसतात. गेल्या अकरा वर्षांमध्ये म्हणजे मोदी सरकारच्या काळात अनेकानेक क्षेत्रांमध्ये प्रचंड प्रगती झाली. प्रगती झाली की समृद्धी येते. समृद्धीतून नवा श्रीमंत वर्ग तयार होतो. तो गुंतवणूक करतो व आणखी समृद्धी आणतो तसेच रोजगार निर्मिती करतो. हे चक्र चालत राहिले तर कोणत्याही देशाच्या भल्याचे असते. परंतु, समृद्धीतून तयार झालेले श्रीमंत लोक देश सोडण्याचा विचार करीत असतील तर केवळ तेच चुकताहेत असे नव्हे, तर आपल्या व्यवस्थेचेही काही तरी चुकत असले पाहिजे, हे समजून या प्रश्नावर उपाय केले पाहिजेत. ते देशद्रोही आहेत, त्यांनी देश सोडला तर भारताचे काही बिघडत नाही, हा उथळ प्रतिसाद झाला. असा प्रतिसाद देणाऱ्यांची अर्थकारण व समाजकारणाची समज अत्यल्प असते. समजून घ्यायचे ते हे की एखादा अब्जाधीश आपले कुटुंब परदेशात घेऊन जातो तेव्हा त्याच्यासोबत बरेच काही देशातून निघून जाते. श्रीमंतांच्या स्थलांतरात जगात भारताचा क्रमांक तिसरा. पहिला चीन आणि दुसरा ब्रिटन. हे दोन्ही देश अंतर्गत आर्थिक आव्हानांना तोंड देत आहेत. चीनमधून बाहेर पडण्याच्या तिथल्या नागरिकांच्या मानसिकतेमागे हुकूमशाहीचा वरवंटा आणि मंदावलेली आर्थिक प्रगती हे कारण आहे, असे अभ्यासक म्हणतात. ब्रेक्झिटनंतरची अस्थिरता आणि दंडात्मक कर व्यवस्थेमुळे ब्रिटनमधील श्रीमंत लोक देश सोडून जात आहेत. भारतातून बाहेर पडणाऱ्या किंवा पडू पाहणाऱ्यांसाठी तसे ठोस कोणतेच कारण दिसत नाही. तरीही भारतातील अनेक श्रीमंत-अतिश्रीमंतांना देश सोडावासा वाटतो, याचे कारण आपल्या लालफितशाही व नोकरशाहीमुळे त्रस्त झालेल्या वातावरणात दडलेले आहे.

भ्रष्टाचारमुक्तीच्या बाता नेहमीच होतात आणि तरीही पैसा न देता कोणतेच काम सरकारी कार्यालयात होत नाही. कितीही योग्य पद्धतीने बाजू मांडली तरी वेळेत न्याय मिळेल, याची शाश्वती नाही. अशा स्थितीतही १४० कोटींच्या वर लोक भारतात राहतातच. परंतु, ज्यांना शक्य आहे, ते विदेशात स्थलांतरित होण्याचा विचार करतात. तसा विचार करून कृतीत आणणाऱ्यांची संख्या लाखांत आहे. आता केवळ देशभक्तीच्या आणाभाका देऊन ते थांबणार नाहीत. एक मोठा उद्योगपती विदेशात स्थलांतरित होतो तेव्हा तो केवळ त्याचा पैसा तिकडे नेतो, असे नाही. पैसा तर नेतोच, शिवाय तो त्याचे नेटवर्क, त्याच्या संस्थेची परंपरा, त्याचा अनुभव, त्याचा सीएसआर आणि उद्यमशीलतेसाठी आवश्यक असणारी ऊर्जाही सोबत घेऊन जातो. बरेच जण व्यावसायिक हितसंबंधांसाठी भारतात घर-कार्यालय ठेवतात. परंतु, त्यांच्यातील मानसिक बदल स्पष्ट असतो आणि तो असा की, भारत हा त्यांचा भूतकाळ असून, तो त्यांचे भविष्य नाही. भारताला हे स्थलांतर रोखायचे असेल तर आपल्या व्यवस्थेत आमूलाग्र बदल आणि ते देखील तातडीने घडवून आणणे आवश्यक आहे. नोकरशाहीला विधायकतेचे वळण देणे, नियमांमधील संदिग्धता दूर करणे, न्यायपालिकेच्या कामाचा वेग वाढवणे, पायाभूत सुविधांवरील ताण कमी करणे, चांगली आरोग्यसेवा व्यवस्था, उत्तम शिक्षण व्यवस्था, व्यवसायांच्या वाढीसाठी चांगले वातावरण, सामाजिक शांतता अशा साऱ्या विषयांत लक्ष घालावे लागेल. सध्याच्या जगात श्रीमंतांसाठी देशाच्या सीमांना फारसा अर्थ उरलेला नाही. पैसा असेल तर अनेक देश नागरिकत्व देण्यास तयार असतात. नागरिकत्व ही आता विकायची वस्तू बनली आहे. विसंगती अशी आहे की भारतीय लोकांची जागतिक स्तरावर कामगिरी कौतुकास्पद आहे. आमचे सीईओ जगातील सर्वांत मोठ्या कंपन्या चालवतात. आमचे अभियंते सिलिकॉन व्हॅलीला शक्ती देतात. आमचे डॉक्टर्स जागतिक दर्जाची रुग्णालये चालवितात. पण, हीच प्रतिभा कशी रोखायची किंवा परत आणायची यात आपण मार खातो आहोत. हे स्थलांतर स्वाभाविक नाही. तो आपल्या व्यवस्थात्मक व संस्थात्मक ऱ्हासाचा इंडिकेटर आहे. अमेरिकेसारखे मोजके देश वगळता यूएई, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, कॅनडा किंवा अगदी युरोपमधील काही देशांकडे यापूर्वी भारतीयांचा ओढा राहत नसे. त्यांनी श्रीमंतांना आकर्षित करण्यासाठी काही व्यवस्था केल्या. किमान आयकर, गुंतवणुकीच्या माध्यमातून नागरिकत्व, स्वच्छ-सुंदर-स्वस्थ-शांत शहरांमध्ये निवास व्यवस्था हे त्यांनी आवर्जून केले. भारत एका वळणावर उभा आहे. एका बाजूला अर्थकारणातील विकास व तंत्रज्ञानाची लाट, स्टार्टअप संस्कृती आणि सॉफ्ट पॉवरची शक्ती. दुसरीकडे विविध कारणांमुळे अस्वस्थ होत असलेला आणि देश सोडण्याचा विचार करणारा श्रीमंतांचा वर्ग अशी ही विसंगती. ती दूर करायची असेल तर अशा मंडळींच्या देशप्रेमाला आवाहन तर करावेच लागेल, शिवाय त्यांना त्यांच्या निर्णयाचा फेरविचार करावा लागेल, असे बदलही वेगाने घडवून दाखवावे लागतील.

प्रासंगिक



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

# दशकपूर्ती डिजिटल इंडियाची

दहा वर्षांपूर्वी आम्ही इतर कोणीही प्रवेश न केलेल्या एका क्षेत्रात आत्मविश्वासाने वाटचाल सुरू केली. भारतीय लोक तंत्रज्ञानाचा वापर करतील की नाही अशी शंका घेतली जायची त्या काळात आम्ही हा विचार बदलून तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या भारतीयांच्या क्षमतेवर विश्वास ठेवला. तंत्रज्ञानाचा उपयोग गरिबी आणि श्रीमंतीमधला फरक आणखी वाढवेल असा विचार कित्येक दशके केला गेला. आम्ही ही मानसिकता बदलली आणि तंत्रज्ञानाच्या मदतीनेच ही तफावत कमी केली.

जेव्हा हेतू चांगला असतो तेव्हा नवीन उपक्रम वंचितांचे सक्षमीकरण करतात. जेव्ही दृष्टिकोन सर्वसमावेशक असतो तेव्हा तंत्रज्ञान संभ्रमावस्थेतील लोकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणते. हाच विश्वास डिजिटल इंडियाचा पाया ठरला. सर्वांसाठी सोप्या, सर्वसमावेशक डिजिटल तंत्रज्ञान पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि संधी उपलब्ध करून देणे यासाठी डिजिटल इंडिया अभियान सुरू करण्यात आले.

२०१४ मध्ये इंटरनेटचा वापर मर्यादित होता, डिजिटल साक्षरता कमी होती आणि ऑनलाईन सरकारी सेवादेखील मर्यादित स्वरूपाच्या होत्या. भारतासारखा विशाल, वैविध्यपूर्ण देश डिजिटल साक्षर बनेल की नाही, अशी बऱ्याच लोकांना शंका होती. आज या प्रश्नाचे उत्तर डेटा आणि डॅशबोर्डने नाही तर १४० कोटी भारतीयांच्या जीवनातून दिले गेले आहे. प्रशासन ते शिक्षण, देण्याघेण्याच्या व्यवहारांपासून उत्पादन क्षेत्रापर्यंत प्रत्येक ठिकाणी डिजिटल इंडिया आहे.

**डिजिटल भेद नष्ट करताना :** २०१४ मध्ये सुमारे २५ कोटी इंटरनेट कनेक्शन्स होती. आज ही संख्या वाढून ९७ कोटींपेक्षा जास्त झाली आहे. देशाच्या कोनाकोपऱ्यात ४२ लाख किलोमीटरपेक्षा जास्त लांब ऑप्टिकल फायबर केबलचे जाळे विस्तारलेले आहे. ही लांबी पृथ्वी आणि चंद्र यांच्यामधील अंतराच्या अकरा पट आहे.

भारताच्या ५जी नेटवर्कची व्याप्ती जगात सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या व्याप्तींपैकी एक आहे. भारतात केवळ दोन वर्षांत ४.८१ लाख बेस स्टेशन्स स्थापन करण्यात आली आहेत. गतिमान इंटरनेट सेवा आता शहरांपासून गलवान, सियाचीन व लडाखसारख्या सीमेवरच्या सैन्य चौक्यांपर्यंत पोहोचली आहे.

आमचा डिजिटल कणा असलेल्या इंडिया स्टॅकने यूपीआय सक्षम बनविले. यूपीआयद्वारे वर्षाला १०० अब्जांपेक्षा जास्त आर्थिक व्यवहार होतात. जगभरात होणाऱ्या डिजिटल आर्थिक व्यवहारांमधले निम्मे व्यवहार भारतात होतात. थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) ४४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थेट नागरिकांना हस्तांतरित करण्यात आली आहे, ज्यामुळे मध्यस्थांची भूमिका संपुष्टात आली असून ३.४८ लाख कोटी रुपयांची गळती रोखली गेली आहे. स्वामित्वसारख्या योजनांनी २.४ कोटींहून अधिक मालमत्ता कार्ड जारी केली आहेत आणि ६.४७ लाख गावांचे मॅपिंग केले आहे, ज्यामुळे जमिनीशी संबंधित वर्षानुवर्षांच्या अनिश्चिततेचा अंत झाला आहे.

**सर्वांसाठी संधींचे लोकशाहीकरण :** भारताची डिजिटल अर्थव्यवस्था आता पूर्वीपेक्षा जास्त एमएसएमई आणि लघु उद्योजकांना सक्षम बनवत आहे. ओएनडीसी (ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स) हे एक क्रांतिकारी व्यासपीठ आहे जे विक्रेते आणि खरेदीदारांच्या मोठ्या बाजारपेठेशी थेट संपर्क स्थापन करून नवीन संधींची खिडकी उघडते. जीईएम (गव्हर्न्मेंट ई-मार्केटप्लेस) मुळे सामान्य माणूस सरकारच्या सर्व विभागांना वस्तू आणि सेवा विकू शकतो. यामुळे सामान्य नागरिकांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होतेच, शिवाय सरकारचे पैसेही वाचतात.

**कल्पना करा :** तुम्ही मुद्रा कर्जासाठी ऑनलाईन अर्ज करता. तुमच्या कर्ज योग्यतेचे खाते संग्राहक चौकटीद्वारे मूल्यांकन केले जाते. तुम्हाला कर्ज मिळते, तुम्ही तुमचा व्यवसाय सुरू करता. तुम्ही जीईएमवर नोंदणी करता, शाळा आणि रुग्णालयांना पुरवठा करता आणि नंतर ओएनडीसीच्या माध्यमातून ते मोठे करता.

ओएनडीसीने अलिकडेच २० कोटी व्यवहारांचा टप्पा ओलांडला आहे - शेवटचे १० कोटी व्यवहार फक्त ६ महिन्यांत झाले आहेत. बनारसी विणकरांपासून ते नागालॅण्डमधील बांबू कारागिरांपर्यंतचे विक्रेते आता मध्यस्थांशिवाय देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. जीईएमने ५० दिवसांत १ लाख कोटी रुपयांचा एकूण व्यापारी मूल्य टप्पा ओलांडला आहे, ज्यामध्ये २२ लाख विक्रेत्यांचा समावेश आहे, ज्यामध्ये १.८ लाखांहून अधिक महिला संचालित एमएसएमईंचा समावेश आहे, ज्यांनी ४६,००० कोटी रुपयांचा पुरवठा केला आहे.

**डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा : भारताचे जागतिक योगदान :** भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (डीपीआय) - जसे की आधार, कोविन, डिजिलॉकर, फास्टॅग, पीएम-वाणी आणि वन नेशन वन सबस्क्रिप्शन - आता जागतिक स्तरावर वाचल्या आणि स्वीकारल्या जात आहेत. कोविनमुळे जगातील सर्वांत मोठी लसीकरण मोहीम राबवणे शक्य झाले. या माध्यमातून २२० कोटी क्यूआर - सत्यापित प्रमाणपत्रे जारी केली गेली. आजमितीला डिजिलॉकरचे ५४ कोटी वापरकर्ते आहेत, या सुविधेअंतर्गत ७७५ कोटींपेक्षा जास्त दस्तावेज सुरक्षित आणि निर्धोकपणे राखले जात आहेत.

भारताने आपल्या जी-२० च्या अध्यक्षपदाच्या काळात जागतिक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा राखीव निधीचा तसेच २५ दशलक्ष डॉलर इतक्या सामाजिक प्रभाव निधीचा प्रारंभ केला. यामुळे आफ्रिका आणि दक्षिण आशियातील देशांना सर्वसमावेशक डिजिटल परिसंस्थेचा अवलंब करू शकले आहेत.

**स्टार्टअपची शक्ती आणि आत्मनिर्भर भारत :** सद्य:स्थितीत भारताची स्टार्टअप परिसंस्थेचा समावेश जगातील आघाडीच्या ३ स्टार्टअप परिसंस्थांमध्ये झाला आहे. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेअंतर्गत १.८ लाखांपेक्षा जास्त स्टार्टअप अस्तित्वात आहेत. मात्र ही केवळ एक स्टार्टअप चळवळ नसून, तंत्रज्ञानाला नवा आयाम देण्याचा भारताचा प्रयत्न आहे. भारतातील युवा वर्गात कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक कौशल्ये आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक बाबतीत मोठी प्रगती होताना दिसते आहे. देशात १.२ अब्ज डॉलर्स खर्चाच्या तरतुदीनुसार इंडिया एआय मिशन राबवले जात आहे. याअंतर्गत भारताने प्रति जीपीयू तासासाठी १ डॉलरपेक्षाही कमी या जागतिक पातळीवरील सर्वांत कमी मूल्याने ३४,००० जीपीयूची उपलब्धता सुनिश्चित केली आहे. यामुळे भारत ही केवळ सर्वांत स्वस्त इंटरनेट अर्थव्यवस्थेसोबतच, सर्वांत परवडणारे संगणन केंद्र बनला आहे.

भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाअंतर्गत मानवता प्रथम तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. याअनुषंगानेच नवी दिल्ली कृत्रिम बुद्धिमत्ता जाहीरनाम्यातून उत्तरदायी कृत्रिम बुद्धिमत्तेसह नवोन्मेषाला चालना दिली गेली आहे. देशभरात कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र स्थापित केले जात आहेत.

**पुढची दिशा :** पुढचे दशक आणखी परिवर्तनकारी असेल. आपण डिजिटल प्रशासनापलीकडे जात, जागतिक डिजिटल नेतृत्वाच्या दिशेने - इंडिया फर्स्टपासून ते इंडिया फॉर द वर्ल्ड अर्थात जगासाठी भारत या भावनेने वाटचाल करत आहोत.

डिजिटल इंडिया आता केवळ एक सरकारी कार्यक्रम राहिलेला नाही, तर ती एक लोकचळवळ बनली आहे. ही चळवळ आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचे केंद्र बनले आहे आणि ही चळवळ भारताला जगाचा विश्वासार्ह नवोन्मेष विषयक भागीदाराचे स्थान मिळवून देत आहे. सर्व नवोन्मेषक, उद्योजक आणि स्वप्न पाहणाऱ्यांसह अवघे जग नव्या डिजिटल क्रांतीसाठी भारताकडे डोळे लावून बसली आहे.

चला, आपण असे काही घडवू जे सशक्त बनवेल.

चला, अशा तंत्रज्ञानासह नेतृत्व करू जिथे एकजूट साधली जाते, सहभागी करून घेतले जाते आणि उन्नती साधली जाते.

वेध

गिरीश शेरेकर

# पीडित पुरुषांची संख्या वाढती

पुण्याचे वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण ताजेच आहे. अशा स्वरूपाच्या घटना राज्याच्या कानाकोपऱ्यात कमी-अधिक प्रमाणात रोज घडत आहेत. महिलांचा छळ व त्यांच्यावरील अत्याचाराच्या घटना अजिबात कमी झालेल्या नाहीत. अमरावती शहर पोलिस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या १० पोलिस ठाण्यांत जानेवारी ते मे या पाच महिन्यांत महिलांचा छळ झाल्याची ५७ प्रकरणे दाखल झालीत. पती-पत्नीत समेट घडवून आणण्याचे महिला सेलचे प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर ही प्रकरणे दाखल झाली आहेत. राज्यभरात ही संख्या किती असेल याचा अंदाज येतो. आता पूर्वीपेक्षा महिला छळाच्या प्रकरणांना वेगाने वाचा फुटते आणि संबंधिताला तातडीने अटक होऊन शिक्षादेखील होते. या विषयाची जनजागृती देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे. विविध संस्था, संघटना त्यासाठी कार्य करत आहेत. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे महिला पीडित पुरुषांची संख्या वाढत आहे. याकडे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संघटनांचे दुर्लक्ष होत आहे.

जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत अमरावती पोलिस आयुक्तालयाच्या महिला सेलकडे ३७ पुरुषांनी महिलांकडून छळ झाल्याच्या तक्रारी दिल्या आहेत. ही संख्या फक्त एका शहराची आहे. यावरून राज्यातील संख्येचा अंदाज बांधता येतो. महिला छळाच्या प्रकरणांची ज्या पद्धतीने चर्चा होते, त्या तुलनेत पुरुषांच्या छळाची दखल घेतली जात नाही. राज्यभरात आजपर्यंत असे एकही प्रकरण गाजल्याचे ऐकिवात नाही. विशेष म्हणजे अनेक पुरुष छळ होत असूनही तक्रारी दाखल करत नाही. कारण, समाजात उलटसुलट होणाऱ्या चर्चांची, मानहानीची भीती त्यांना वाटते आणि मोठ्या हिमतीने आवाज उठविला तर आपल्यावर विश्वास ठेवला जाईल का? हा प्रश्न त्यांना सतावतो. या बोटचेप्या भूमिकेमुळे त्यांना अतोनात त्रास सहन करावा लागतो. पुढे त्याचे वाईट परिणाम होतात. तशा घटना घडल्यादेखील आहे. जे पुरुष तक्रारींसाठी समोर आले आहेत, त्यांचे अनुकरण त्रास भोगणाऱ्यांनी करायला हवे आणि तक्रारींसाठी पुढाकार घ्यायला हवा. पुरुषसत्ताक असलेली कुटुंबव्यवस्था हळूहळू महिलासत्ताक होत असल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतील. पुरुषांना होणाऱ्या त्रासाची मालिका येथेच थांबत नाही. महिलेने पुरुषाविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दिली तर लगेच गुन्हा दाखल होतो. एखाद्या पुरुषाने महिलेची तक्रार दिली तर गुन्हा दाखल व्हायला वेळ लागतो. पोलिस विभाग प्रसार माध्यमांना जेव्हा प्रसिद्धी पत्रकातून माहिती देतो, तेव्हा महिला फिर्यादी किंवा आरोपी असेल तर नाव दिले जात नाही. सामाजिक भान म्हणून ते बरोबर आहे. मग, पुरुषांसाठी तोच नियम असायला हवा. मात्र, पुरुषांच्या बाबतीत अगदी उलट आहे. त्याचे नाव ठळकपणे दिले जाते. तो फिर्यादी असो की आरोपी! प्रसार माध्यमे त्यांची नावे ठळकपणे छापतात. गुन्हा सिद्ध व्हायच्या पूर्वीच आरोपी म्हणून त्याची इज्जत वेशीवर टांगली जाते. अनेक प्रकरणांमध्ये तर पुढे पुरुष निर्दोष सिद्ध होतात. त्यावेळी मात्र त्यांच्या निर्दोषाच्या बातम्या येत नाहीत. अशा काही प्रकरणांमध्ये सुरुवातीलाच इतकी बदनामी झालेली असते की, अनेक पुरुषांचे आयुष्य उद्ध्वस्त होते.

महिलांकडून येणाऱ्या सर्वच तक्रारी खऱ्या असतात, असेही नाही. काही तक्रारी विशिष्ट उद्देशातून आलेल्या असतात. कायद्याची जागृती व्यापकपणे झाल्याने अनेकांना तो चांगल्या पद्धतीने समजायला लागला आहे आणि तो सोयीनुसार वापरायचा कसा, याचे ज्ञानही अनेकांना अवगत झाले आहे. त्यामुळे तक्रार आणि त्यानंतर दाखल गुन्ह्यांची माहिती देताना जो नियम महिलांसाठी आहे, तोच पुरुषांसाठी असायला हवा. माध्यमांनी सुद्धा महिलांप्रमाणे पुरुषांविषयी संवेदनशीलता दाखवायला हवी. न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्यानंतर सविस्तर माहिती जाहीर करायला काही हरकत नाही. पण, त्यापूर्वीच फक्त पुरुषांची माहिती जाहीर करणे म्हणजे त्यांच्यावर घोर अन्याय करण्यासारखे आहे. एक प्रकारे त्यांच्या अधिकारांचे ते हननच आहे. महिलाच पीडित असतात असे नाही. पुरुषही पीडित असतात. पण, महिलांना जेवढी सहानुभूती मिळते, तितकी पुरुषांना मिळत नाही, हे वास्तव आहे. उपरोक्त विषय गंभीर आहे. समाजात या विषयावर चर्चा व्हायला हवी. पुरुषांनी जागरूकता दाखवत आपल्या न्याय्य हक्कांसाठी चळवळ उभारायला हवी. अनेक विषयांप्रमाणे स्वयंसेवी संस्थांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. काही पीडित पुरुष धाडसाने पुढे आले आहेत. त्यांना बळ द्यायला हवे. त्रास सहन करणाऱ्या पुरुषांनी न्यायासाठी पुढे यावे. कायदा सर्वांसाठी सारखा आहे. त्याचा वापर करावा, हीच अपेक्षा.

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# विज्ञानमय कोश-अंतर्ज्ञान आवरण!

पंचकोशाचा विचार करताना आपले शरीर म्हणजे स्थूल देह. आत्म्याभोवतीचे भौतिक आवरण. त्यानंतर येते ते आपले जीवनदायी शरीर म्हणजे सूक्ष्म देह जे आत्म्याभोवतीचे प्राणमय आवरण आहे. त्यानंतर आत्म्याभोवती येते ते मानसिक आवरण, त्याला कारण देह असेही म्हणतात. त्यानंतर आत्म्याभोवती चौथे महत्त्वपूर्ण आवरण म्हणजे विज्ञानमय कोश. हा आपला महाकारण देह आहे. याला आत्म्याभोवतीचे बौद्धिक आवरण म्हणतात. हा आपला आध्यात्मिक देह आहे.

विज्ञानमय कोश बुद्धी, ज्ञान आणि वैचारिक क्षमतेशी संबंधित आहे. विज्ञान हा शब्द आपल्या सर्वांना परिचित आहे. सर्वसाधारणपणे विज्ञान म्हणजे शास्त्र ज्याला इंग्रजीत 'सायन्स' म्हणतात, असे आपण गृहीत धरतो. भारतीय शिक्षा पद्धत आणि तत्त्वज्ञानात इतका संकुचित अर्थ अभिप्रेत नाही. शाश्वत सत्य आणि असत्याचेही सखोल ज्ञान म्हणजे विज्ञान होय.

अजून लक्षात घ्या, आत्म्याला परमात्म्याशी जोडणे याला व्योम म्हणतात. व्योम म्हणजे विज्ञान होय. भारतीय विचारात ज्ञान म्हणजे विवेकाने जीवनमुक्ती मिळविणे. 'सा विद्या या विमुक्तये' यात 'आत्मनो मोक्षार्थं जगद्हितायच' स्वहित आणि जगद्हित यांचा यथार्थ विचार करते ते ज्ञान. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले ते ज्ञान, निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वर माउलींना सांगितले ते ज्ञान. ज्ञानातूनच विज्ञान हा शब्द आला. विज्ञान हा संस्कृत शब्द आहे. विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. सोप्या भाषेत त्याला अंतर्ज्ञान म्हणू. म्हणजे आत्म्याभोवतीचा चौथा कोश हा विज्ञानमय कोश आहे. हा कोश म्हणजे आत्म्याभोवतीचे ज्ञानाचे आवरण अर्थात विशेष ज्ञानाचे आवरण होय. विज्ञानमय कोश आपल्यामध्ये विवेक निर्माण होतो.

**काय करतो विज्ञानमय कोश? :** ज्ञानाचे दोन प्रकारात वर्गीकरण करू. १) साधारण ज्ञान २) आत्मिक ज्ञान. हे दोन्ही ज्ञान आवश्यकच आहेत. पहिल्या ज्ञानाने ऐहिक (व्यावहारिक) आणि दुसऱ्या ज्ञानाने (आध्यात्मिक) पारलौकिक मार्ग सापडतो. यालाच शास्त्रात अभ्युदय आणि निःश्रेयस म्हणतात. साधारण ज्ञान स्थूल शरीराशी म्हणजे अन्नमय कोशापर्यंत मर्यादित असते. हे ज्ञान पोट आणि पोटाखालच्या भागाचा अधिक विचार करते. म्हणून याला सांसारिक ज्ञानही म्हणतात. दुसरा प्रकार म्हणजे आत्मिक ज्ञान. आत्मिक ज्ञान पोटासोबतच पोटाच्या वर हृदय आणि त्याच्यावर मेंदू म्हणजे मन आणि बुद्धीचा विशेष विचार करते. म्हणूनच त्याला आत्मिक ज्ञान किंवा अंतर्ज्ञान म्हणतात. हेच विशेष ज्ञान. यालाच विज्ञानमय कोश म्हणतात. ज्ञान म्हणजे केवळ माहिती, पण विज्ञान म्हणजे धारणा, अनुभूती, श्रद्धा इत्यादी. म्हणूनच विज्ञानमय कोश महत्त्वाचा आहे. सोप्या भाषेत सांगतो. आपण हे ऐकले आहे...

'नातुडे मुख्य परमात्मा, म्हणोनी करावी लागे प्रतिमा' अमूर्त परब्रह्म परमात्मा कळत नाही म्हणून मूर्त स्वरूपात देवाची मूर्ती आपण पाहतो. मूर्ती हे सामान्य ज्ञान आणि परब्रह्म परमात्मा विशेष ज्ञान आहे. विज्ञानमय कोश या विशेषापर्यंत पोचण्याची क्षमता देतो. पंच ज्ञानेंद्रिये आणि बुद्धी मिळून हा कोश बनतो. केवळ आपले शरीर म्हणजे मी नाही तर आत्मानुभूती महत्त्वाची आहे. आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार, आत्मलाभ, आत्मकल्याण यासाठी विज्ञानमय कोश पुष्ट हवा. अज्ञानरूपी अंधारातून ज्ञानाचा प्रकाश देतो तो विज्ञानमय कोश. तैत्तिरीय उपनिषदात महर्षी वरुण भृगू ऋषींना ज्ञान सांगत बसले नाहीत तर त्यांनी आत्मानुभूतीसाठी तप करायला सांगितले. विज्ञानमय कोश विशुद्धी चक्र, आज्ञाचक्र आणि सहस्रार चक्राच्या कक्षेत स्थित आहे. थोडक्यात बुद्धी, ज्ञान आणि अंतर्ज्ञान हे विज्ञानमय कोशाचे घटक आहेत.

विज्ञानमय कोशाचा विकास म्हणजे बुद्धीच्या ग्रहणशक्तीचा, धारणाशक्तीचा, स्मरणशक्तीचा, कल्पनाशक्तीचा, निरीक्षण आणि परीक्षणशक्तीचा, तर्कशक्ती आणि अनुमानशक्तीचा, संश्लेषण आणि विश्लेषणशक्तीचा विकास होय. थोडक्यात बुद्धीद्वारा ज्ञानग्रहण क्षमता विस्तारित करणे हे विज्ञानमय कोशाचे कार्य होय. बुद्धी ही मनापेक्षा सूक्ष्म असते. सद्सदविवेक, सारासार विचार या कोशाचे फळ आहे.

**विज्ञानमय कोश म्हणजे सदैव जागृतीचे केंद्र :** या कोशाचा विकास वय वर्ष १५ ते १८ मध्ये अधिक जोमात होतो. यासाठी जरा अंतर्मुख होण्याची सवय करावी. म्हणजे काही काळ डोळे लावून पूर्ण शांतीची अनुभूती घेण्याचा प्रयत्न करावा. अवधानपूर्वक ध्यान. या स्थितीला सत्यज्ञानमय अवस्था म्हणतात. म्हणजे मेंदू निर्विचार करावा, पण हे शक्य नसते. अशावेळी बुद्धीला एकच विचार द्यायचा तो म्हणजे त्या दिव्यशक्ती परमात्म्याचे यथाज्ञात स्वरूप डोळ्यांसमोर आणणे. बुद्धीचे जागरण होईल असे खेळ मुलांना सांगणे, स्वयंनिर्मितीसाठी प्रवृत्त करणे.

आपल्याला तीन प्रकारचे मन असते.

**१) चेतन मन :** आपली जागृत अवस्था. या अवस्थेत होणाऱ्या क्रिया जाणिवेत असतात. त्याला नित्यव्यवहार म्हणू!

**२) अधोचेतन मन :** आपण जागृत नसलो, तरी त्या आंतरिक क्रिया होतातच. उदा. हृदयाचे ठोके, रक्ताभिसरण इत्यादी. या क्रिया नेणिवेत होतात.

**३) ऊर्ध्वचेतन मन :** इथे विज्ञानमय कोश महत्त्वाचा. विवेकबुद्धी महत्त्वाची आहे. सहावे इंद्रिय हेच आहे. हृदय आकाशाला जगद्आकाशाशी जोडणे. व्यष्टीचा परमेष्ठीशी धागा जोडणे. ज्ञानेश्वर माउलींनी याला 'मुस ओतोनिया मेण सांडले' म्हटले.

या देहरूपी मुशीत जे मीपणाचे मेण आहे त्या मुशीत अनात्म भावाचा रस ओतला तर मुशीतील मेण आपोआप सांडते आणि अरूपाचे रूप तयार होते. यासाठी केवळ अन्नग्रहण, प्राणायाम, यम, नियम, आसन पर्याप्त नाहीत. हे सर्व अन्नमय, प्राणमय आणि मनोमय कोशाला प्रभावित करतात. ते आवश्यकही आहेत. पण भारतीय तत्त्वज्ञानात ही परमोच्च अवस्था नाही. त्यासाठी विज्ञानमय कोशावरही लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. मन निर्विचार करून अंतर्मुख होण्यासाठी विपश्यना महत्त्वाची आहे.

चैतन्यप्रकाश बुद्धीला प्रकाशित करतो तेव्हा कुठलेही प्रतिबिंब मुक्त चित्तवृत्ती, चिदाभास म्हणजे 'मैं नहीं तू ही' हा भाव जागृत होतो. हेच तर 'अत्त दीप भव!' आहे. यासाठी विज्ञानमय कोश महत्त्वाची भूमिका घेतो. म्हणूनच तैत्तिरीय उपनिषद विज्ञानमय कोशाला ब्रह्म म्हटले आहे.

'विज्ञान ब्रह्मेति व्यजानात। विज्ञानाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते।
विज्ञानेन जातानि जीवन्ति। विज्ञान प्रयन्त्यभिसंविशंतीति ॥'

खरं सांगू, विज्ञानमय कोश आनंदमय कोशाचा मार्ग प्रशस्त करतो.

९८२२२६२७३५

## वारीच्या पवित्र परंपरेवर होणारा घाला

पंढरीची वारी म्हणजे शेकडो वर्षांची परंपरा असलेला एक भावसोहळा आहे. 'पांडुरंग, पांडुरंग', 'ज्ञानेश्वर माउली, ज्ञानराज माउली तुकाराम' अशा जयघोषात, ऊन, पाऊस, तहान-भूक, वेदना यांचा विचार न करता महिला, वृद्ध, बालक असे लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटरचा प्रवास करून पंढरपूरला येतात.

जात-पात, गरीब-श्रीमंत असा भेदभाव नसलेली वारी हीच वारकऱ्यांची खरी श्रीमंती आहे. मात्र आज, या श्रद्धेवर आणि परंपरेवर घाला घालण्याचे प्रयत्न विविध मार्गांनी होत आहेत. काही अन्य पंथीय वारीत सहभागी होऊन आपापल्या धर्माचा प्रचार करत आहेत. उर्दूमध्ये 'अल्लाविना कुणी देव नाही' असे फलक लावणे, धर्मप्रसारासाठी पत्रकांचे वाटप करणे असे प्रकार घडत आहेत. याच वारीत काही अंनिसवाले, पुरोगामी आणि साम्यवादी मंडळी 'संविधान समता दिंडी' या नावाने राज्यघटनेविषयी जागृती करत असल्याचा हास्यास्पद प्रकारही घडत आहे. ज्यांना राज्यघटना शिकवण्याची आवश्यकता आहे त्यांना ती शिकवण्याचे धारिष्ट्य नसल्यामुळे की काय हिंदूंनाच राज्यघटना शिकवली जात आहे. अनेक शतकांपासून वारीच्या परंपरेत कधीही हिंसाचार झाला नाही, कुणाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या नाहीत. कुठल्याही धर्मावर टीका करण्यात आलेली नाही. तरीही अशा धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत अशा प्रकारचे राजकीय आणि धर्मांतराला प्रवृत्त करणारे प्रकार घडत आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे.

तेव्हा, वारकऱ्यांनी या प्रकारांना बळी न पडता, संघटितपणे याविरुद्ध आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे.


**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

वाचक पत्रे

## मोबाईलद्वारे मतदानाची सोय

बिहारच्या स्थानिक निवडणुकीत मोबाईलद्वारे किंवा निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर मतदानाची सुविधा पहिल्यांदा उपलब्ध झाल्याची बातमी नुकतीच वाचण्यात आली. प्राथमिकदृष्ट्या ही सोय खरोखरच स्वागतार्ह आहे आणि तंत्रज्ञानाच्या युगात आवश्यक वाटते. या प्रकारची अंमलबजावणी करण्यापूर्वी कुठल्या कठीण परीक्षेतून ही प्रणाली गेली आहे काय? तसेच संबंधित राजकीय पक्षांना




विश्वासात घेतले गेले काय? हेही माहीत होणे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात मतदानाची टक्केवारी अपेक्षेपेक्षा फार कमी असते. निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन व निवडणूक अधिकारी शक्य तितक्या जास्त मतदानकरिता प्रयत्नरत असतात. सरकारी यंत्रणेचे बजेट सुद्धा भारी असते परंतु अपेक्षित टक्केवारी साधता येत नाही.

वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला, भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक आपत्तीमुळे अडकलेले नागरिक, शिक्षण, नोकरीनिमित्त बाहेरगावी असणाऱ्या मतदारांसाठी ही उत्तम सोय ठरू शकते. सी -डॅकने विकसित केलेल्या ई-व्होटिंग ॲप मोबाईलवर इन्स्टॉल करून मतदान करता येईल. एका मोबाईल क्रमांकावर दोन मतदार मतदान करू शकतील, फेस रीडिंग, डिजिटल स्कॅनिंगमुळे गडबड होणार नाही, मते सुरक्षित राहतील अशा प्रकारची हमी देण्यात येत आहे. केंद्रावर मतदाराची संख्या आणि मतदानाची एकूणच प्रक्रिया बघता संपूर्ण यंत्रणेवर फार मोठा ताण असतो. अशा ई-व्होटिंगमुळे तणाव थोडा का होईना कमी व्हायला मदत होईल. मतदान प्रणाली कुठलीही असो, पेपर बॅलेट असो वा मतदान यंत्र प्रत्येकाचे फायदे-तोटे आहेत आणि विश्वासार्हतेचा प्रश्न आहे. मोबाईल हॅक किंवा सायबर हल्ला या पद्धतीवर विपरीत परिणाम करणार नाही याची शाश्वती होणे गरजेचे राहील. विशेष जनजागृती मोहीम आणि जनतेचा विश्वासच या प्रणालीची यशस्विता व भविष्यातील दिशा सिद्ध करेल. मोबाईलद्वारे मतदान सध्या तरी स्वयंपूर्ण नव्हे तर एक पूरक प्रणाली म्हणून सिद्ध होईल यात शंका नाही.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

●● ●●

## नोंदणीकृत संस्थेला देणगी देताना सावधान

नोंदणीकृत संस्थेला आपण जी देणगी देतो म्हणजे आपल्याला पैसै जास्ती झाले म्हणून देत नसतो तर त्या पैशाचा त्या सौस्थेला सहकार्य व्हावे त्यातून काही उत्तम कार्य हावे दिलेल्या रकमेचे व्याज सौस्थेला दरवर्षी मिळतच असते पण ह्या व्याजाचा उपयोग आणि देणगी देणार्याची किम्मत जर त्याना नसेल तर देणगी आणि सभासद वर्गणी देताना देणार्यानी विचार करावा कारण मला ही खुप अनुभव आलेला आहे त्यामुळे मानसिक त्रास झालेला आहे असे वाटते की मी ते पैसे अशा लोकाना देण्यापेक्षा गरीबाना दिले असते तर बरे झाले असते आपला पैसा कृपया गैरवापर करणाऱ्या संस्थेला देताना सावधान.

**- शोभना सागर,** जेष्ठ वृत्तपत्रलेखिका, सोलापूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तेर येथे कृषिदुतांकडून कृषी दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२ जुलै -**




महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्म दिनानिमित्त कृषी महाविद्यालय आळणी (गडपाटी) येथील कृषिदुतांकडून कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ग्राम ीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम आणि सालाना उपक्रमांतर्गत कृषी दिनानिमित जि.प. केंद्रीय शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवृंद व ग्रामस्थांमध्ये प्रभातफेरीद्वारे जनजागृती केली.

कृषिदिनानिमित्त वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील भरीव योगदान व त्यांचे उल्लेखनीय कार्यामुळे महाराष्ट्र हा अन्नधान्यासाठी स्वयंपूर्ण गावकऱ्यांना पटवून सांगितले. तसेच शाळेतील मुख्यध्यापक पाडोळे यांनी तरुण पिढीने शेतीकडे वळावे व सेंद्रिय शेती करण्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी सरपंच दीदी काळे, ग्राम सेवक बाबासाहेब खोचरे, कृषी सहायक राम शिंदे, जि.प.च्या केंद्र प्रमुख पडवळ, प्राचार्य डॉ.के.एच. पाटील यांनी सहभाग नोंदवला.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### अभिनेत्री शितल काळे यांनी घेतले श्री तुळजा भवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.२ जुलै -**

हिंदी सिनेमातील युवा अभिनेत्री शितल काळे हिने दि.०१ जुलै २०२५ रोजी रात्री १० वाजता तिच्या कुलस्वामिनी आई तुळजा भवानी मातेचे प्रथमच कुलधर्म कुलाचार करून देवि दर्शनाचा लाभ घेतला.यावेळी त्यांचे पौरोहित्य स्वराज कदम यांनी केले.यावेळी त्यांचा देविची प्रतिमा व पादुका असलेली मुर्ती देवून भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष कदम यांनी सत्कार केला.शितल काळे यांनी २०१३ मध्ये मुंबईतील कर्म कला मंच थिएटरमधून करिअरची सुरुवात केलेली होती. अटल फैसला चमेली आणि जय छती माँ सारख्या हिंदी चित्रपटामधील भूमिकांमुळे तिला सुरुवातीची ओळख मिळालेली. २०२३ मध्ये तिने हिंदी सिनेमातील प्रसिद्ध अभिनेत्री विश्वसुंदरी सुष्मिता सेनसोबत ताली या मालिकेद्वारे ओव्हर-द-टॉप (ओटीटी) प्लॅटफॉर्मवर पदार्पण केले. विशेष म्हणजे, तालीमध्ये शितल काळे यांनी एका ट्रान्सजेंडर व्यक्तिरेखेची भूमिका साकारली, ज्यात तिने अभिनेत्री म्हणून तिची बहुमुखी प्रतिभा दाखवून दिलेली आहे. मिर्झापूर वेब सिरीज मधील भुमिका देखील प्रचंड गाजली. यावेळी तिने श्री तुळजा भवानी मंदिर संस्थानने दर्शनाची सोय उत्तमरित्या केली त्याबद्दल समाधान व्यक्त करून मंदिर संस्थानचे विशेष आभार मानले.



### चिमुकल्यांची आषाढी एकादशीनिमित्त वारी दिंडी सोहळा

**तुळजापूर, दि.२ जुलै -**

येथील क्रांतीज्योती क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले अंगणवाडी क्रमांक १ मध्ये आषाढी एकादशी निमित्त लहान मुलांची वारी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विठ्ठलाच्या मूर्ती आणि प्रतिमेचे पूजन करून गवते प्लॉटिंग तुळजापूर खुर्द येथे टाळ मृदंगाच्या वाद्यात हरिनाम गजरामध्ये चिमुकल्यांच्या घोषणाबाजी मध्ये वारी काढण्यात आली. विठ्ठल रुक्मिणी आणि वारकऱ्यांच्या वेशभूषा केल्याने पालकासह नागरिकांनी वारी पाहण्यासाठी गर्दी केली होती. आषाढी एकादशीनिमित्त एक स्तुत्य असा उपक्रम राबवण्यात आला लहान चिमुकल्यांची वारी, दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी अंगणवाडी सेविका उषा जाधव (धाकतोडे) व मदतनीस रेश्मा सावंत त्याचबरोबर सर्व पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# बांधावर होणाऱ्या शेतमाल खरेदीत शेतकऱ्यांची फसगत

## ▶▶ आमदार कैलास पाटील यांच्याकडून अधिवेशनात मुद्दा उपस्थित....मंत्री म्हणाले सरकार नियंत्रण ठेवणार!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**



पणन विभागांतर्गत शेतकऱ्यांच्या महत्वाच्या अडचणीवर आमदार कैलास पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले. यामध्ये भावांतर योजना व बांधावर होणाऱ्या खरेदीमध्ये शेतकऱ्यांची होणारी फसवणूक यावर त्यांनी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केले.

आमदार पाटील म्हणाले, सोयाबीन खरेदी केंद्रावर ज्या शेतकऱ्यांनी नोंदणी केली. अश्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झालेले नाही. खरेदी केंद्र उशीरा सुरु होणे, खरेदी केंद्राची संख्या मर्यादित तसेच बारदाना व इतर अडचणीमुळे खरेदीच प्रमाण खूप कमी झाले आहे. ज्या शेतकऱ्यांचे नोंदणी करूनही सोयाबीन खरेदी झाले नाही अश्या शेतकऱ्यांना भावांतर योजना लागू करणार का असा प्रश्न आमदार पाटील यांनी विचारला. शिवाय हे अनुदान कधीपर्यंत सरकार देणार असाही सवाल उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या बांधावरून शेतीमालाची थेट खरेदी करण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढले आहे. पण यामध्ये अनेक व्यापारी हे माल खरेदी करतात व नंतर गायब होत असल्याचे प्रकार पाहायला मिळत आहेत. व्यापारीची काहीच माहिती नसल्याने त्याची कुठे तक्रार देखील करता येत नाही. त्यामुळे अश्या खरेदीवर शासन नियंत्रण ठेवणार का? ज्या प्रकारे बाजार समिती मधील व्यापारावर सरकार नियंत्रण ठेवते त्याच पद्धतीने अश्याही खरेदीबाबत सरकार काय करणार आहे असा प्रश्न आमदार कैलास पाटील यांनी उपस्थित केला. त्यावर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी उत्तर दिले. ते म्हणाले की बांधावर होणारी खरेदी हा विषय अडचणीचा ठरत असल्याचे त्यांनी मान्य केले.

बांधावर होणाऱ्या शेतीमालाची व्यापारी खरेदी तर करतात पण त्याचे पेमेंट करण्यावेळी ते गायब होतात. अश्या खूप तक्रारी आपल्या विभागाकडे येत आहेत. हे व्यापारी कोण आहेत त्यांची कोणतीही माहिती शेतकऱ्यांना नसते.त्यामुळे ते पोलीस ठाण्यात तक्रार करतात पण तांत्रिक अडचणीमुळं गुन्हा नोंद होत नाही. मागील काळात थेट खरेदी करण्यासाठी डायरेक्ट मार्केट लायसन्स वितरित करण्यात आले. हे परवाने मोठ्या प्रमाणात वितरित करण्यात आल्याने व त्यामध्ये काही चुकीच्या लोकांनीही परवाने काढले आहेत. तेच लोक याद्वारे शेतकऱ्यांना फसवत आहेत. बाजार समिती मध्ये सरकारच खरेदी व्यवहार यावर नियंत्रण असते. आताही ज्या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात अशी खरेदी होते त्या स्थानिक व्यापाऱ्यांनी परवाने काढून घ्यावेत. याच व्यापाऱ्यांनी ही खरेदी करावी किंवा कोणी खरेदी केली आहे यावर बाजार समितीने लक्ष द्यावे अशी सरकारची भूमिका असल्याच मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.



## श्री संत भगवान बाबा पालखीचे आवारपिंपरीत जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ जुलै -**

भगवान बाबा वरील श्रद्धा, विठ्ठल नामाचा जयघोष, टाळ मृदंगाचा निनाद करीत पालखी दि.१ जुलै रोजी परंडा मार्गे दुपारच्या वेळी आवारपिंपरी येथे मुक्कामासाठी दाखल झाली.

यावेळी ग्रामस्थ मंडळींनी भगवान बाबा पालखीचे जंगी स्वागत करून पादुकाचे पुजन केले व पुष्पवृष्टीही केली संध्याकाळी पालखी मुक्कामी राहिली वारकरी परंपरेनुसार भजन कीर्तन हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, अशा घोषनांनी आवारपिंपरी दुमदुमली तर पालखीतील पादुकाचे यावेळी ग्रामस्थांकडून पूजन करण्यात आल्यावर सायंकाळी वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, नवनाथ गुडे, महावीर नरूटे, सुंदर दास नरूटे, दादा पाटील, ज्योतीराम जाधव, सागर गुडे, सतीश नाथा गुडे, राजेश काळे, पप्पू घळके, व आवारपिंपरी येथील ग्रामस्थ दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री संत भगवान बाबाची हि पालखी आवारपिंपरी येथे सन २००४ पासून मुक्कामी येत आहे. श्री संत भगवान बाबा पालखीने दि. २ जुलै मंगळवार रोजी कुर्डवाडी मार्गे पंढरपूर कडे प्रस्थान केले.

## हरित धाराशिव : वाशी नगरपंचायतकडून सहा हजार वृक्षरोपणाचे नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जुलै -**




जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांच्या संकल्पनेतून साकारण्यात येत असलेल्या हरित धाराशिव अभियानांतर्गत वाशी नगरपंचायतच्या वतीने भव्य वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे. दि.१९ जुलै रोजी पाण्याची टाकी परिसर तांदुळवाडी रोड वाशी येथे एकाच दिवशी सहा हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमात शालेय विद्यार्थी सामाजिक संस्था पर्यावरण प्रेमी नागरिक आणि स्थानिक अधिकारी मोठ्या उत्साहात सहभागी होणार आहेत. या उपक्रमाचा उद्देश शहरातील हरित क्षेत्र वाढविणे पर्यावरण स्नेही वातावरण निर्माण करणे आणि भविष्यासाठी स्वच्छ व आरोग्यदायी पर्यावरण देणे हा आहे.

कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्ये स्थानिक जातीच्या झाडांचे वृक्षारोपण करंज गुलमोहर अशोक बदाम वृक्ष संगोपनासाठी ट्रेकिंग व देखभाल व्यवस्था सामाजिक सहभागातून जनजागृती नागराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक, तसेच मान्यवरांच्या उपस्थित वृक्षारोपणाचा प्रारंभ होईल, वाशी नगरपंचायत सर्व नागरिकांना या वृक्षलागवडीच्या उपक्रमात सहभागी होऊन हरित वाशी...हरित धाराशिव घडवण्याच्या मोहिमेत सक्रिय भूमिका बजावावी असे आवाहन वाशी नगरपंचायतीकडून करण्यात आले आहे.

## शिक्षक सेवानिवृत्तीनंतर समाजसेवेसाठी कार्यतत्पर होतो : माजी सभापती डोंगरे

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.२ जुलै -**




तुळजापुर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथिल जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी रामा राठोड यांचा सेवापूर्ती सोहळा १ जुलै रोजी कंचेश्वर मंदिर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाची सुरवात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली.

दरवर्षी विवीध क्षेत्रातील अनेक अधिकारी सेवानिवृत्त होत असतात परंतु शिक्षक हा कधीही सेवानिवृत्त होत नसून उलट ते अधिक जोमाने समाजसेवेसाठी कार्यतत्पर होतात असेच शिक्षक शिवाजी राठोड यांनी जे मंगरुळ वासियांच्या मनात जे आपले अढळ स्थान निर्माण केले आहे ते यापुढच्या काळातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य इमाने इतबारे करुन तेच अढळ स्थान निर्माण करावे यांच्या प्रमाणेच समाजात शाळेत व इतरही क्षेत्रात निष्ठेने, प्रामाणिकपणे, नैतिकता बाळगून सेवा देणारे शिक्षक व अधिकारी तयार व्हायला हवेत, असे गौरवद्वार काढून शिक्षक-पालक यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी स्वतः सतत प्रयत्नशील राहून वेळप्रसंगी कठोर भूमिकाही घेईन असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंद डोंगरे यांनी अध्यक्षीय भाषणाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले.

या सन्मान सोहळ्यात जिल्हा परिषदेचे माजी सदस्य महेंद्र धूरगुडे, गट शिक्षण अधिकारी अर्जुन जाधव, माजी गट शिक्षण अधिकारी वाय.के.चव्हाण, विस्तार अधिकारी माने, सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे व शाळेतील विद्यार्थीनी यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक देविदास राठोड यांनी व सूत्रसंचालन संजय भालेराव यांनी तर आभारप्रदर्शन सुरेश राऊत यांनी मानले. यासाठी जि.प. प्रशालेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शा.व्य.समिती व मंगरुळ ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## वाशिरा नदीवरील अतिक्रमण हटवा; मनसेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जुलै -**



वाशी शहरातून वाशीरा (लेंडी) नावाची नदी वाहते. या नदीच्या वाशी फाट्यापासून उगम होत आहे. तपोवनपासून इंदापूर रोडपर्यंत या नदीवर मोठ्या नेत्यांचे काही ठिकाणी अतिक्रमण झाले आहेत. पोलीस ठाणे रस्त्यावरील पुलाच्या पश्चिमेस व पूर्वेस दोन्ही बाजूने नगरपंचायतच्या जागेवर अतिक्रमण झाले आहेत. ही अतिक्रमणे तात्काळ हटवा अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात, वाशी नगरपंचायत चे मुख्य अधिकारी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक या सर्वांच्या संमतीने नदीपात्रातील जमीन संबंधातील माणसांच्या घशात घालण्याचे काम चालू आहे.

यावर प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही तसेच लोकप्रतिनिंकडून याला कोणताही विरोध केला जात नाही. ही शोकांतिका आहे.

नगरपंचायतला वेळोवेळी विविध संघटनांना आवाज उठवला आहे. तसेच आतापर्यंत या वाशीरा नदीवरील अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथेही तक्रार देण्यात आली आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर कालांतराने वाशी शहरातील एकमेव ऐतिहासिक नदी लुप्त होऊन जाण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच १९९२/९३ सालच्या झालेल्या पावसामध्ये पोलीस स्टेशन रस्त्यावरील फुलावर दोन माणसे वाहून गेली होती. तसेच भविष्यात मोठा पाऊस झाला तर नदीकाठच्या घराला पुराचा धोका निर्माण होईल.

महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने नदीकाठाचे अतिक्रमण पंधरा दिवसांत काढण्यात यावे अन्यथा नगरपंचायत विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, याची असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष अक्षय चेडे, शहराध्यक्ष श्रीमंत कवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मालमत्तेविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

भुम तालुक्यातील हाडोंग्री येथील पुनम चंद्रकांत गडबडे (वय ३८) यांच्या अंदाजे ६० हजार किंमतीची हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल (क्र. २५ बी.बी. ९९०४) अज्ञात व्यक्तीने दि. २५ जून रोजी रात्री घरासमोरून चोरून नेली. या प्रकरणी पुनम गडबडे यांच्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३७९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रोड रोमिओचा बंदोबस्त करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ जुलै -**



ग्रामीण भागातून शिकण्यासाठी शहरातील शाळा, महाविद्यालयात मोठ्या संख्येने ग्रामीण मुली शहरात येतात. या विद्यार्थिनींना बस किंवा खासगी वाहनाद्वारे प्रवास करावा लागतो. बसच्या प्रतिक्षेत असणाऱ्या विद्यार्थिनींना अनेकदा रोडरोमिओकडून मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. पोलीस प्रशासने याकडे लक्ष देवून अशा रोडरोमिओंचा बंदोबस्त करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल हौसलमल यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, अनेकदा दुचाकी वाहनावरून येणाऱ्या टवाळखोरांकडून मुलींना मानसिक त्रास सहन करावा लागतो, असे प्रकार टाळण्याच्या दृष्टिने पोलीस प्रशासनाचे लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी दररोज शिक्षणासाठी ये-जा करतात आणि प्रायव्हेट शिकवणी वर्ग आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळी विद्यार्थ्यांची वर्दळ असते. शिवाय शाळा सुटल्यानंतर किंवा शिकवणी वर्ग सुटल्यानंतर सायकलने ग्रामीण भागात किंवा घरी जाणार्या विद्यार्थिनींची रोडरोमियो पाठलाग करतात.

चौकातही टवाळखोरांचा त्यांना त्रास सहन करावा लागतो. यापूर्वी काही शाळांच्या प्रशासनाने शाळा सुटण्याच्या व सुरू होण्याच्यावेळी पोलिसांनी सेवा द्यावी, अशी विनंती पत्राद्वारे केली होती. या अर्जानंतर काही दिवस येथे पोलिसांची गस्त होती. परंतु काही दिवसानंतर येथे पोलीस राहत नसल्याची संधी साधुन टवाळखोर मुलींना नाहक त्रास देतात. तसेच खाजगी शिक्षण देणाऱ्याप्रत्येक शिक्षकाची चारित्र पडताळणी करून घ्यावी.


विद्यार्थिनींच्या तक्रारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्ष राहुल हौसलमल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्ष यांनी मागणीचे दिले आहे. या निवेदनावर शहराध्यक्ष अमर गोरे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ऑनलाईन जुगारात कर्जबाजारी; लुटमारीचा बनाव पोलीसांनी २४ तासात केला उघड

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ जुलै -**

मटका आणि ऑनलाईन जुगार यामुळे कर्जबाजारी झालेल्या नळदुर्ग येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या शाखा व्यवस्थापकाने स्वतःच स्वतःवर धारदार शस्त्राने वार करुन घेत लुटमार झाल्याचा कांगावा करुन तब्बल २५ लाख रुपये हडपण्याचा प्रयत्न केल्याचे स्थानिक गुन्हे शाखा व नळदुर्ग पोलिसांनी अवघ्या २४ तासात या गुन्ह्याची उकल करत संबंधित शाखाधिकाऱ्याला गजाआड करुन त्यांने लपवुन ठेवलेले २५ लाख रुपये हस्तगत केले आहे.

कैलास मारुती घाटे वय ३५ रा नळदुर्ग हा नळदुर्ग येथील लोकमंगल मल्टीस्टेट को - ऑपरेटिव्ह सोसायटी लिमटेड शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणुन नोकरीस आहे. सोमवार दि.३० जुन रोजी कैलास घाटे हा दिवसभरात शाखेत जमा झालेली रक्कम घेऊन मोटार सायकल वरून सोलापुर येथील मुख्य शाखेत जमा करण्यासाठी जात असताना सोलापुर - हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर इटकळच्या पुढे थोडया अंतरावर पाठीमागुन दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी तरुणांनी कैलास घाटे यांच्या तोंडावर मीरची पुड फेकली. यावेळी डोळ्यात मिरची पुड गेल्याने घाटे यांनी स्वताची मोटार सायकल बाजुला घेतली असता त्या दोन अनोळखी तरुणांनी बॅग घेण्यासाठी झाटापट केली. यावेळी घाटेनी त्यांना प्रतिकार केला असता त्या तरुणांनी त्यांच्यावर धारदार शास्त्राने वार करुन बॅग घेऊन पोबारा केला अशी तक्रार घाटे यांनी नळदुर्ग पोलिस ठाण्यात दिली होती.



राष्ट्रीय महामार्गांवर इतकी मोठी दरोड्याची घटना घडल्याचे समजताच पोलिस प्रशासन खडबडुन जागे झाले आणि त्यांनी या घटनेचा तपास सुरु केला. जिल्हा पोलिस अधीक्षक रीतु खोकर, अप्पर पोलिस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची टीम तसेच नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव व सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने यांनी घटनास्थळी भेट देऊन या गुन्ह्याचा तपास सुरु केला. यावेळी त्यांनी सीसीटीव्ही तपासले तसेच अतिशय बारकाईने या गुन्ह्याचा तपास सुरु केला.

यावेळी पोलिसांनी कैलास घाटे याच्याकडे या घटनेची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस कैलास घाटे याने या घटने संदर्भात सांगितलेल्या माहितीमध्ये विसंगती दिसुन येत असल्याने पोलिसांनी कैलास घाटे याच्यावरच तपास केंद्रीत केला. कैलास घाटे जखमी असल्यामुळे त्याच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु होते.

पोलिसांनी रुग्णालयात जाऊन कैलास घाटे यांच्याकडे चौकशी केली मात्र सुरुवातीला तो कांहीच सांगत नव्हता. मात्र रुग्णालयातुन डिस्चार्ज मिळाल्यानंतर पोलिसांनी कैलास घाटे याला पोलिस ठाण्यात आणुन त्याच्याकडे चौकशी सुरु केली. त्याहीवेळी तो कांही थांगपता लागु देत नव्हता मात्र पोलिसांनी पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखविताच कैलास घाटे याने आपणच हा बनाव केल्याचे कबुल केले. त्याचबरोबर एका शेतात कडब्याच्या भनमीमध्ये लपवुन ठेवलेले २५ लाख रुपये पोलिसांना दिले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जमवार, नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मोरे, कासार, खटके यांनी अतिशय बारकाईने व योग्य तपास करून अवघ्या २४ तासात २५ लाख रुपये हडपण्याच्या उद्देशाने स्वतावर वार करुन घेत लुटमार झाल्याचा कांगावा करणाऱ्या कैलास घाटे याच्या मुसक्या आवळत त्याच्याजवळुन २५ लाख रुपये हस्तगत केले.

कैलास घाटे याला पगार केवळ १३ हजार रुपये होता. त्यातुन त्याला मटका तसेच ऑनलाईन जुगाराचा नाद लागल्यामुळे तो कर्जबाजारी झाला आणि यातुनच त्यांने हे कृत्य केल्याचे समोर येत आहे. पोलिसांनी कैलास घाटे याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे. याबबतचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने हे करीत आहेत.


## छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**अभिजित दिलीपसिंग ठाकुर रा. माऊली नगर, नळदुर्ग** यांची **दहावी पासची टीसी** नळदुर्ग बसस्थानकात प्रवास दरम्यान हरविली आहे. ज्यांना ही टीसी सापडली आहे त्यांनी खालील नंबरवर संपर्क करावे.

**संपर्क : ९०२८६४९०६३**

# ‘रोटरी मिडटाऊन कट्टा’ ठरणार शहराच्या हृदयात विरंगुळ्याचा नवा श्वास -डॉ.पांचाळ

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात उतरविणाऱ्या रोटरी क्लब जालना मिडटाऊनचा बैठक व्यवस्था, विद्युत रोषणाई, वॉकिंग ट्रॅक, सेल्फी पॉईंटचा अविष्कार असलेला ’रोटरी मिडटाऊन कट्टा’ हा जालन्यातील विरंगुळ्याचा अनमोल ठेवा ठरेल, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी येथे बोलताना काढले.

जालना शहरातील दुर्गा माता मंदिर ते पोलीस प्रशिक्षण केंद्रासमोरील परिसरात रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनच्या पुढाकाराने आणि पोलीस प्रशिक्षण विद्यालय, महापालिका, समस्त महाजन ट्रस्ट यांच्या सहकार्याने सुशोभीकरण करण्यात येऊन रोटरी

## रस्त्यालगतच्या ओसाड जागेला लाभले नवजीवन

मिडटाऊन कट्टा तयार करण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्याहस्ते आणि महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, पोलीस अधीक्षक अजय बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक बनकर, समस्त महाजन ट्रस्टचे उदय शिंदे, क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सचिव गौरव मोदी, प्रकल्प प्रमुख प्रतीक नानावटी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि. ३० जून रोजी सायंकाळी




करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. रस्त्यालगतचा सर्व परिसर सपाटीकरण करून तेथे २० सिमेंट बेंचेस, पथदिवे, विद्युत रोषणाई, संरक्षक जाळी बसविण्यात येऊन, झाडांना रंग देण्यात देण्यात येऊन, फुटपाथ तयार करण्यात आला आहे. त्यामुळे हा परिसर अतिशय नयनरम्य बनला आहे.

यावेळी महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर म्हणाले की, रोटरीचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांच्या उपक्रमाला महापालिकेचे सदैव सहकार्य राहील. पोलीस अधीक्षक अजय बंसल म्हणाले की, रोटरी परिवाराचे सामाजिक उपक्रम आणि पोलीस प्रशासनाच्या उपक्रमात सदैव योगदान लाभते. अशोक बनकर यांनी सकारात्मक कार्यासाठी कोणीतरी पुढाकार घेण्याची गरज असते. रोटरी मिडटाउनच्या पुढाकारातून हा परिसर अत्यंत नयनरम्य बनला आहे. प्रास्ताविकपर भाषणात रोटरी क्लब जालना मिडटाउनचे अध्यक्ष सागर दक्षिणी म्हणाले की, आमच्या कार्यकाळाचा शुभारंभ देवमूर्ती येथील भवानी माता मंदिर परिसरात वृक्षारोपणाने करण्यात आला आणि समारोपदेखील माता दुर्गादेवीच्या सानिध्यात ’रोटरी मिडटाऊन कट्टा’ या नाविन्यपूर्ण उपक्रमाने होत आहे. या उपक्रमाचा उद्देश विशद प्रकल्प प्रमुख प्रतीक नानावटी यांनी विषद केला. कार्यक्रमाला रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता नानावटी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सचिव गौरव मोदी यांनी मानले.

## खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केले नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार (२ जुलै) शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या पालखी रथाचे बार्शी तालुक्यातील अरण येथे दर्शन घेतले आणि नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य केले. यावेळी त्यांनी नाथांच्या चरणी लीन होत भरपूर पाऊस पडू दे, बळीराजासह सगळी जनता सुखी राहुदे, असे साकडे घातले. व जालना लोकसभा मतदार संघातील वारीतील अनेक दिंड्यांना भेटी दिल्या. याप्रसंगी पैठणचे रविंद्र काळे, संदीप बोरसे, भाऊसाहेब जगताप, सदाशिव विटेकर, दिंडी चालक नाथ वंशज रघ–नाथ बुवा गोसावी, योगेश बुवा गोसावी, पप्पुराज ठुबे, शिवाजी ढाकणे, भाऊसाहेब गवळी, सावता गाडेकर, कैलास वाघ, विठ्ठल कोरडे, संतोष मेटे, बाबुराव डकले, पंढरीनाथ जाधव, मुकेश चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव ,जयप्रकाश दादा चव्हाण, राम सिरसाठ, बाळासाहेब वाकुळणीकर, अरूण पैठणे, विजय गव्हाणे, गणेश कोळकर आदींची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## काँग्रेसच्या जाफराबाद तालुका अध्यक्षपदी अजय बनकर



तभा वृत्तसेवा
टेंभुर्णी/प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुका काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी अजय बनकर यांची नियुक्ती महाराष्ट्र काँग्रेस चे प्रांताध्यक्ष श्री हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून ही नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष एडवोकेट गणेश पाटील यांनी नुकतीच जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपदी अजय बनकर यांना नियुक्तीपत्र देऊन तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. या पत्रात आपल्या भागातील काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी आपण जोमाने प्रयत्न करावे व तळागाळातील काँग्रेस कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटना पक्ष बांधणी मजबूत करावी , तसेच पंधरा दिवसाच्या आत आपल्या तालुक्याची कार्यकारणी तयार करावी असे नियुक्तीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या कित्येक वर्षापासून पहिल्यांदाच जाफराबाद तालुक्याला काँग्रेस साठी तरुण व सुशिक्षित असा खेडेगावातील तळेगाव येथील अजय बनकर यांना तालुक्यातील काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी पक्षाच्या वतीने संधी दिली गेल्याचे काही निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्याकडून बोलल्या जात आहे.

त्यांच्या या निवडीची जाफराबाद तालुक्यातील काँग्रेस कार्त्यांनी अभिनंदन केले आहे.

## भारतीय स्टेट बँक इंडिया ७० वर्षे पूर्ण निमित्त वडीगोद्री येथे वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथे भारत देशातील गोरगरिबाची भरोशाची बँक म्हणून ओळखल्या जाणारी भारतीय स्टेट बँक ला आज ७० वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्त वडीगोद्री अंबड तालुका प्रमुख बाळासाहेब गावडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी बँक मॅनेजर यांनी पुष्पगुच्छ देऊन बाळासाहेब गावडे तालुकाप्रमुख अंबड यांच्या सत्कार केला येथे उपस्थित असलेले सर्व ग्राहक यांच्या स्टॉप गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले व सर्वांना ७० वर्ष पूर्ण झाल्याचे निमित्त सर्वांना मिठाईवाटप केली एसबीआय मॅनेजर व स्टॉप व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोदावरीबाई कनके यांचे निधन



तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अबंड तालुक्यातील भांबेरी येथील गोदावरी बप्पासाहेब कनके यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने मगंळवारी रात्री ११ वाजता निधन झाले .म्रृत्युसमयी त्यांचे वय ९०वर्ष होते. त्यांच्या पश्चात ३ मुल १ मुलगी नातू पणतु असा मोठा परीवार होता .भांबेरी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले खरेदी विक्री संघाचे चेअरमन भाउसाहेब पा. कनके यांच्या त्या आई होत .तसेच भांबेरीचे सरपंच अन्नासाहेब कनके यांच्या आजी होत्या.

## कर्ज मागायला लाज कशी वाटत नाही? कृषी दिनीच शेतकऱ्यांचा अपमान!

तभा वृत्तसेवा
तळणी/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत कृषी दिनाच्या दिवशीच शेतकऱ्याला बँक अधिकाऱ्याने झिडकारल्याची धक्कादायक घटना घडली. कर्ज मागायला लाज कशी वाटत नाही? अशा अपमानजनक शब्दांत शेतकऱ्याला हिणवण्यात आले. या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

ही घटना १ जुलै रोजी घडली असून, उस्वद येथील प्रगतशील शेतकरी वसंत नायब राव सरोदे यांनी याबाबतची तक्रार थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केली आहे. काही दिवसांपूर्वीच सरोदे यांनी आपली थकबाकी – ८२,६११ रुपये – पूर्णपणे भरून काढली होती. त्यानंतर त्यांनी नव्या हंगामी कर्जासाठी अर्ज केला. मात्र, शाखाधिकारी बी. जे. केडिया यांनी सार्वजनिकरित्या अपमान करत, वारंवार कर्ज मागायला कशाला येता? लाज वाटत नाही का? असे वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप आहे. कृषी दिनासारख्या शेतकऱ्यांच्या सन्मानाच्या दिवशीच असा अपमान झाल्याने ग्रामस्थांत आणि शेतकरी

### तळणी शाखेतील बँक अधिकाऱ्याच्या वागणुकीचा संताप; संबंधित विरोधात कारवाईची मागणी

वर्गात तीव्र नाराजी आहे. तक्रारीत वसंत सरोदे यांनी १० जुलै रोजी आत्मदहनाचा इशारा दिला असून, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात शाखाधिकारी केडिया यांनी संपर्क केला असता, मी शेतकऱ्याला असं काहीही बोललो नाही. माझ्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत. मात्र कुणाचा गैरसमज झाला असेल, तर मी सर्वांसमोर माफी मागतो, असे स्पष्ट केले. दरम्यान, शाखाधिकारी केडिया यांच्याविरोधात यापूर्वीही खाते होल्ड करणे, कर्ज नाकारणे आणि ग्राहकांना अपमानित करणे यासारख्या तक्रारी झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचा तीव्र निषेध करत उबाठाचे तालुका संघटक ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे यांनी २ जुलै रोजी संबंधित शेतकऱ्यांसह शिवसैनिकांना घेऊन

## स्व.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करा -अर्जुन नायक



तभा वृत्तसेवा
परतूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पद भुषविणारे, आधुनिक महाराष्ट्रो शिल्पकार, हरित कांतीचे जनक, रोजगार हमीचे जनक, मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब यांच्या ११२ वी जयंती सर्व राज्यभर कृषिदिन म्हणून मोठ्या उत्साहता साजरी करण्यात येते. परंतू जालना जिल्हामधील शासकीय, निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय, जयंतीचा विसर पडलेला दिसून आले आहे. आज रोजी बंजारा समाज कोणत्याही वादामध्ये नाही जयंती साजरी न करून समस्त बंजारा समाजाच्या भावना दुःखविल्या आहेत.

तरी बंजारा समाजाचा आदराचा भान ठेवून जयंती साजरी न करण्या–यांची सखोल चौकशी करण्यात यावी. ज्यांनी साजरी केली आहे त्या कार्यालय, शाळा, महाविद्यालयातील ऋक्षे ढरससळपस झर्हीं किंवा फोटो, पंचनाम सादर करण्याचे सुचना आपणा मार्फत देण्यात यावे ही नम्र विनंती,

सदरील प्रकरणी सखोल चौकशी करण्यात न आल्यास सर्व जालना जिल्हातील बंजारा समाज विभागीय आयुक्त कार्यालय समोर आमरण उपोषण करेल अर्जुन नायक, प्रदेश सचिव महाराष्ट्र अंकुश सुखदेव चव्हाण, पवन सुरेश अंकुश विठ्ठल जाधव, अंकुश कुंडलीक चव्हाण, अविनाश भाऊसाहेब राठोडे यांच्यासह वसंतराव नाईक साहेबांची जयंती सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय मध्ये साजरी न करता समाजाच्या भावना दुःखवीणा–यात आल्या आहेत. तरी जयंती साजरी न करणा–या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करा अर्जुन नायक बंजारा बिर्गेड प्रदेश सचिव. आदी कार्यकर्ते उपस्थित होते .

## बस चालकांच्या उर्मट, मुजोर पणाला प्रवासी वैतागले



तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटीची ओळख आहे.गाव तिथे एसटीची सेवा कौतुकास्पद ठरते. सर्वांची आवडती लालपरीसी जनतेचे अत्यंत जिव्हाळ्याचे आपुलकीचे नाते आहे. परंतु अंबड आगाराच्या उर्मट,मुजोर वाहकांच्या (कंडक्टर) बेजबाबदारपणाचा प्रवाशांना नाहकत्रास सहन करावा लागत आहे. अंबड आगारातील बहुतांशी कंडक्टर विशेष करून महिला कंडक्टरला प्रवाशांच्या सेवेसाठी या एसटीच्या ब्रीद वाक्याचा विसर पडला असल्याचे दिसून येते. प्रवाशांना सौजन्यपूर्ण,नम्रतापूर्वक सेवा प्रदान करणे अत्यंत आवश्यक असताना कंडक्टरच्या उर्मट,मुजरपणाचा प्रवाशांना वारंवार कटू अनुभव येत मनस्ताप सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सौजन्य सप्ताहाचे आयोजन फक्त कागदोपत्री व प्रसिद्धी पुरतेच करत असल्याचे अंबड आगाराच्या बेजबाबदार,मुजोर,उर्मट सेवेवरून म्हणता येऊ शकते. वयस्कर व्यक्ती, विद्यार्थी, महिला प्रवाशांशी देखील अंबड आगाराचे वाहक सौजन्य पूर्ण व्यवहार करत नाही तर एसटी आपल्या स्वतःच्या घरची जहागीरदारी असल्याच्या तोऱ्यात व प्रवाशांना दिल्या मिळणाऱ्या विविध सवलतीचा लाभ आपल्या मुळेच मिळत असल्याचे वाहकांच्या बेजबाबदार कर्तव्यावरून दिसून येते. हात दाखवा गाडी थांबवा,प्रवाशांच्या सेवेसाठी या ओळी फक्त जाहिरात बाजीपुरत्या मर्यादित असल्याचे अंबड आहाराकडे पाहून म्हणता येईल अनेक वेळा प्रवाशाचे प्रवासादरम्यान तिकिटाचे राहिलेले शिल्लक पैसे वाहकांना परत मागितल्यास त्यांचा पारा चढतो, नाविलाजाणे प्रवासी निमुटपणे आपल्या निर्धारित स्थळी उतरत चालता होतो. याबाबतीत अंबड आगारातील महिला कंडक्टर आघाडीवर असल्याचे दिसून येते.

अंबड आगाराच्या या उर्मट,मुजोर,बेसिस्त सेवेला लगाम लावत सौजन्यपूर्ण सेवा प्रदान करण्याबाबत वरिष्ठांनी सौजन सप्ताहाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करणे गरजेचे असल्याची मागणी प्रवासी वर्गातून मोठ्या प्रमाणात होत आहे.अंबड आगारांच्या कर्मचाऱ्यांमुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेची प्रतिमा जनसामान्यांच्या मनात मलिन न होता सौजन्य पूर्ण सेवा प्रदान करणे अत्यंत गरजेचे आहे तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद वाक्य सार्थकी ठरेल नसता अंबड आगाराच्या उर्मट मुजोर वाहकांमुळे प्रवाशांच्या मनस्तापासाठी म्हणण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे.

## राज्य शासन व आरोग्य विभागामार्फत जखमी २५ लाखाची मदत द्या नसता आंदोलन करणार– केदार

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल असलेल्या शिला संदीप भालेराव यांना प्रसूतीपूर्वी सोनोग्राफी करताना परिचारिका कडून पोटाला जेली ऐवजी ॲसिड लावण्यात आल्याने त्या दुर्दैवी घटनेतील महिला गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती, याच पार्श्वभूमीवर तारीख ०१ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजेच्या दरम्यान ऑल इंडिया पँथरचे संस्थापक अध्यक्ष दीपकभाई केदार यांनी भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयात जाऊन त्या महिलेची भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. सदर घटना ही अतिशय दुर्दैवी असून गंभीर आहे, त्यामुळे निष्काळजीपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर चौकशी करून योग्य ती कार्यवाही करून त्या जखमी महिलेला राज्य शासन व आरोग्य विभागामार्फत २५ लाखाची मदत द्या , असा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की डिलेवारीची महिला आहे तिच्या पोटात एक बाळ आहे , आणि त्याची सोनोग्राफीकरता तुम्ही म्हणतात चुकून पडलं आणि त्या महिलेचा कुटुंब सांगत की पोट पूर्ण काळं झालं आहे, तिला लाँग टाईम किती त्रास होणार आहे, याची फॅसिलिटी कोण देणार आहे आणि हे सर्व प्रकार घडवलं त्यांचा नेमका उद्देश काय ते नेमक्या कोणत्या प्रायव्हेट हॉस्पिटलला अट्याचआहे का? गोरगरिबांनी सरकारी हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरी साठी येऊ नये त्यांच्या मनात भीती बसावी, अशा पद्धतीचे काही शेड यंत्र आहे का? याची सखोल चौकशी कोण करणार असं चालणार नाही हे गंभीर



आहे, सिव्हिल सर्जन यांनी भूमिका घ्यावी, या पीडित महिलेची भेट देखील सिव्हिल सर्जन ने घेतली नाही एस पी यांनी देखील भेट घेतली नाही, या घटनेमध्ये विचारपूस नाही, जिथे घटना घडली तिथेच त्या महिलेला ॲडमिट ठेवले, तिच्यावर कोणी मानसिक दबाव आणला तिला कोणी त्या ठिकाणी टॉर्चर केलं तर कोण जबाबदार आहे,जालनाच्या जिल्हा रुग्णालयामध्ये नेणं गरजेचं आहे, तिथे व्यवस्थित ट्रीटमेंट करणे गरजेचे आहे, आता सुट्टी म्हणत माझं पोटात दुखतंय आजी म्हणते पूर्ण पोट काळ निळं झालं भविष्यात तिच्या जीवाच्या धोक्याची ॲसिडिटी कोण देणार आहे?हा आमचा प्रश्न आहे , याच्यात सखोल चौकशी झाली पाहिजे सहज प्रकरण नाही चुकून असेल पडल असं कसं होऊ शकतं इतिह–ासात कधी घडलं नाही मेडिकलच्या आरोग्य विभागाच्या इतिहासात अशी घटना घडली नाही याच्या मागचा धोका काय हे आमचे आरोप आहे, यामुळे एसपी ने या महिलेची भेट घ्यावी सिव्हिल सर्जन भेट घ्यावी आरोग्यमंत्र्यांनी दाखल घ्यावी मुख्यमंत्र्यांनी देखील दाखल घ्यावी तीन ते चार दिवस झाले घटना होऊन विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे.

विधिमंडळाचा अधिवेशन सुरू आहे इथे चर्चा होत नाही, लाडक्या बहिणीच्या पोटावर जेल समजून अशी टाकले जाते ,पंधराशे रुपये दिले म्हणून झाले मोकळे गरिबांच्या डिलेवारी कुठे होणार असा सरकारी दवाखान्याशिवाय गरिबांना पर्याय काय असा सवाल उपस्थित करण्यात आला असून ये शेडयंत्र नेमकं कसं झालं सीसीटीव्ही कॅमेरा चौकशी झाली पाहिजे हे कसं झालं सगळी चौकशी या ठिकाणी झाली पाहिजे आणि या हॉस्पिटलमध्ये कोणी याच्यात आरोपी त्यांच्या सुद्धा कारवाई झाली पाहिजे ही आमची भूमिका असून मी स्वतः याच्यामध्ये सर्व दखल घेणार असून सामाजिक न्याय विभागाला सुद्धा देखील आव्हान करतोय की यात मोठ्या प्रमाणात कुटुंबाला आर्थिक मदत झाली पाहिजे राज्य शासनाने २५ लाखाची मदत या पिढीतला आरोग्य च्या माध्यमातून झाली पाहिजे,कारण तिच्या जिवाचा धोका हा तळलेला नाही जर का आजच्या आज या महिलेच्या तपासण्या जिल्हा आरोग्य केंद्राने केल्या नाहीत त्या ठिकाणी जिल्ह्याचे आरोग्य विभागाचे अधिकारी येऊन भेटले नाहीत एसपी ने जर भेट घेतली नाही तर मात्र आम्हाल–ाआंदोलनाशिवाय पर्याय नाही आंदोलन केल्याशिवाय आम्ही शांत बसणार असा इशारा देण्यात आला, यावेळी बंटी दादा सदाशिवे (मराठवाडा प्रवक्ता) किशोर शेजुळ ( ऑल इंडिया पँथर सेना तालुका अध्यक्ष भोकरदन) वैशाली शिरसाट, सतीश जाधव राजेंद्र जोगदंडे सतीश खेत्रे बोराडे दीपक बोराडे मंगेश पगारे यांच्यासह ऑल इंडिया पँथर सेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते,

# बोलण्याचा विपर्यास करून विरोधक राजकारण करत आहेत

### शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या असतील तर हजार वेळा माफी मागेल – विधानसभेत आ.बबनराव लोणीकर आक्रमक

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

राजकारण आणि समाजकारणामध्ये गेली ४० वर्ष मी शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका मांडलेली आहे त्यासाठी शेतकऱ्यांचे २५–२५ हजार लोकांचे मोर्चे काढले आहेत. शासन आणि प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर धारेवर धरला आहे त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांविरोधी भूमिका मांडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही मी शेतकरी विरोधी बोललेलो नाही परंतु माझ्या बोलण्याचा विपर्यास करत विरोधकांना केवळ राजकारण करायचं आहे यापूर्वी मी शेतकऱ्यांसाठी लढा दिलेला आहेच आणि रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी शेतकऱ्यांसाठी लढत राहणार आहे. माझ्या मृत्यूनंतर माझ्या हाडांना कान लावून ऐकलं तर त्यामधून सुद्धा मी शेतकरी असल्याचा आवाज येईल अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत अत्यंत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली.

विधानसभेत बोलत असताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की विरोधक केवळ राजकारण करण्याच्या उद्देशाने माझ्या बोलण्याचा विपर्यास करत आहेत



मी जे बोललो ते काही विशिष्ट लोकांसंदर्भात बोललो आहे शेतकऱ्यांसंदर्भात नाही परंतु पराचा कावळा करत विरोधकांनी महाराष्ट्रभर फेक नरेटीव च्या माध्यमातून मी शेतकरी विरोधी वक्तव्य केले असल्याचा कांगावा करत आहेत. मी स्वतः शेतकऱ्यांचा मुलगा असून शेतकऱ्यांच्या भावना मी जाणतो, शेतकऱ्यांसाठी वारंवार रस्त्यावर उतरणारा आणि शेतकऱ्यांच्या बाजूने कायम भूमिका घेणारा मी कार्यकर्ता आहे त्यामुळे मी शेतकरी विरोधी वक्तव्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असेही आमदार बबनराव लोणीकर विधानसभेत म्हणाले. माझ्या बोलण्याचा विपर्यास करून विरोधक केवळ त्यांची राजकीय पोळी भाजण्याचे काम करत आहेत परंतु मी यापूर्वी ही कधी शेतकरी विरोधी बोल–लेलो नाही आणि यापुढे देखील बोलणार नाही. माझ्या बोलण्यामुळे शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मी शेतकऱ्यांची हजार वेळी माफी मागायला तयार आहे. शेतकऱ्यांची माफी मागत असताना त्यात लाज कसली, मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे. मी ४० वर्ष शेतकऱ्यांमुळे राजकारण आणि समाजकारणामध्ये आहे त्यामुळे शेतकरी विरोधी वक्तव्य माझ्याकडून कधीही निघणार नाही परंतु केवळ राजकारण करू पाहणाऱ्या विरोधकांची माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असेही आ.बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत ठणकावून सांगितले.

# कृषी विभाग ॲक्शन मोडवर ; २८ कृषी सेवा केंद्रावर कार्यवाही

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०२ जुलै -**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रांची व्यापक तपासणी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत कृषी सेवा केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या तसेच तपासणीमध्ये त्रुटी आढळल्याने दोषी ठरलेल्या एकूण २८ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आलेली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी ही माहिती दिली आहे.

काही दिवसांपूर्वीच विनापरवाना खताची अवैध विक्री केल्याच्या कारणावरून इस्लापूर व हिमायतनगर येथे अवैध खत विकणाऱ्या विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या इस्लापूर तालुक्यातील एका कृषी सेवा केंद्राचे तिन्ही परवाने कायमस्वरूपी निलंबित करण्यात आले आहेत. या दुकानांमध्ये परवाना नसलेले एचटीबीटी बियाणे यांची वाहतुकीच्या पावत्या अवैध्यरित्या दुकानात आढळून आल्याने इस्लापूर येथील कृषी सेवा केंद्रांचे तिन्ही परवाने कायमस्वरूपी निलंबित करण्यात आले आहेत.

कृषी विभागाच्या तपासणीत कृषी सेवा केंद्रातील विविध त्रुटी उघड झालेले आहेत. यामध्ये भावफलक व साठा फलक न लावणे, विक्री परवाने दुकानदाराने दर्शनी भागात न लावणे, साठा पुस्तके अद्यावत न ठेवणे, स्त्रोत परवान्यात नमूद नसणे, ग्राहकांना निविष्ठा विक्रीच्या पावत्या न देणे, विक्री अहवाल दर महिन्याला सादर न करणे इत्यादी विविध प्रकारच्या त्रुटी आढळल्या आहेत. त्यांची सुनावणी घेण्यात आली व त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली.

दरम्यान अशा २८ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आलेली आहे. याशिवाय विक्री परवानगी घेतली असतानाही दुकान बंद ठेवणाऱ्या केंद्रावरही मोहिमेत विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. या कारवाईमध्ये तालुका नायगाव येथील आठ कृषी सेवा केंद्राचा समावेश असून हदगाव तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र तसेच नांदेड तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र, देगलूर तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र, कंधार तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र, किनवट तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्र, मुखेड तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र, उमरी तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्र, लोहा तालुक्यातील एक व मुदखेड तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र यांचा समावेश आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि नियमानुसार सेवा मिळाव्यात यासाठी ही मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. अशाच प्रकारची नियमित तपासणी सुरु राहणार असून, नियमभंग करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत : सहाय्यक आयुक्त

**नांदेड** -सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता या योजना राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत महाविद्यालयातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी १ जुलै २०२५ पासून ऑनलाईन महाडिबीटी पोर्टल सुरु झालेले आहे. तरी जिल्ह्यातील महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी केले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील प्रवेशीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृतीचे अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन www.mahadbtmahait.gov.in`m संकेतस्थळावर जाऊन शिष्यवृत्ती अर्ज भरावेत. त्या अर्जाची छायांकित प्रत आवश्यक त्या कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयात सादर करावीत.

# आ. भिमराव केराम यांच्या प्रयत्नांना यश : प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या उर्वरित हप्त्यांचा मार्ग मोकळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०२ जुलै -**

किनवट शहरातील प्रधानमंत्री घरकुल योजनेतील लाभार्थ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. आमदार भिमराव केराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, योजनेअंतर्गत उर्वरित अनुदान हप्ते येत्या आठ ते दहा दिवसांत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत.

मुंबई येथे पावसाळी अधिवेशनासाठी उपस्थित असताना दैनिक तरुण भारतशी दूरध्वनीद्वारे संवाद साधताना आमदार केराम यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, घरकुल लाभार्थ्यांना अनेक महिन्यांपासून निधीचा प्रतिक्षा होती. विशेषतः माता-भगिनींना यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते. मात्र, आपण या विषयावर वेळोवेळी शासनाशी पाठपुरावा करून हा निर्णय मंजूर करून घेतला.



या योजनेसाठी एकूण पाच डीपीआर (ऊशींरळश्रशव झीेक्षशलीं ठशर्िेीीं) मंजूर करण्यात आले असून, त्याअंतर्गत एकूण ९४१ लाभार्थ्यांना निधीचा थेट लाभ मिळणार आहे. नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे, घरकुल अभियंता राहुल सातूरवार आणि नगर रचना विभागाचे अधिकारी मामीलवाड यांनी या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावली. लाभार्थ्यांपर्यंत निधी वेळेत पोहोचवण्यासाठी या सर्वांनी समन्वय साधत अथक परिश्रम घेतले.

या निर्णयामुळे शहरातील अनेक गरजू कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार असून, त्यांची दीर्घकाळाची प्रतीक्षा संपली आहे. घरकुल योजनेतील ही निधी मंजुरी म्हणजे आमदार केराम यांच्या प्रभावी नेतृत्वाचे आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रत्यक्ष फलित आहे. प्रशासनाकडून लाभार्थ्यांना लवकरच अधिकृत सूचना देण्यात येणार असून, त्यांनी आपले बँक खाते आणि आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. किनवट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार केराम यांच्या प्रयत्नांची ही आणखी एक यशोगाथा ठरत असून, गरजूंच्या समस्यांवर वेळेत लक्ष देऊन त्यांनी जनतेचा विश्वास अधिक दृढ केला आहे.

# हिमायतनगर तालुक्यातील ग्रा.पं.वर महिलाराज येणार

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.०२ जुलै -**

हिमायतनगर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण १ जुलै रोजी दुपारी ३ वाजता पंचायत समितीच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे व तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या उपस्थितीत प्रवर्गनिहाय आरक्षण सांगितले. ग्रामपंचायतनिहाय आरक्षणाची चिठ्ठी काढून सोडत जाहिर केली. त्यात एकूण ५२ ग्रामपंचायती पैकी २७ जागा महिलासाठी तर २५ जागा पुरुषासाठी सोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे तालुक्यात आता महिलाराज येणार पण त्यांचा कारभार पतिराज सांभाळणार अशी चर्चा होताना दिसून येत आहे. हिमायतनगर तालूक्यात सरपंच पदाच्या आरक्षण सोडतील महिलाराज आले पण आता तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायत चा कारभार पतिराज पाहणार अशी चर्चा आरक्षण सोडत ठिकाणी चालू झाली होती. आता आरक्षण जाहीर झाले असून निवडणुकीची चर्चा रंगू लागली आहे.

५२ ग्रा.पं.चे आरक्षण अनुसूचित जातीसाठी (एससी) ७ पैकी ४ महिला राखीव तर अनुसूचित जमाती (एसटी) १० पैकी ५ महिला, ५ पुरुष तर ओबीसी १४ पैकी ७ महिला व ७ पुरुष तर ओपन २१ पैकी १० पुरुष व ११ ठिकाणी महिलांना संधी मिळाली आहे.

# सा. बां. विभागाचे आडमुठेधोरणा विरोधात जमिन मालकाचे अमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.०२ जुलै -**

उमरी भोकर रोडवरील गट नंबर १८/३ ची जागा सा. बां विभाग भोकर आणि उपविभाग हदगाव यांनी माझे ताब्यात व मालकी हक्कात द्यावी ह्या मागणीसाठी उमरी पहाडगल्ली येथील रहिवासी बद्रीनारायण रानू मदने यांनी दिनांक १ जूलै पासून सा. बां. उपविभाग उमरीचे कार्यालयासमोर अमरण उपोषण मांडले आहे.

उमरी भोकर हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग भोकरचे अखत्यारित येतो. हा रस्ता ज्यावेळी झाला त्यावेळी गट नं. १८/३ मधिल जमिन रस्त्यासाठी संपादित केल्याचे भूमी अभिलेख कार्यालय भोकरचे हद्दबंदी रेखानकाशा वरून स्पष्ट होते परंतू प्रत्यक्षात उमरी भोकर रस्ता हा गट नं. १८/२ मधून नेला गेल्याचे उपरोक्त रेखा नकाशात दर्शविल्या गेले आहे.

आज घडिला सदरील जमिनीचे बाजारमूल्य गगणाला भिडले असून उमरी शहरातील कांही धनदांडगे व गुंडप्रवृत्तीचे लोक ह्या जमिनीवर बेकायदेशिर कब्जा करण्याचा प्रयत्न करित असून त्यावरून संबधित मुळ जमिन मालक व त्या धनदांडग्या व्यक्तीमध्ये वाद होऊन प्रकरण उमरी पोलिसांपर्यंत गेलेले आहे.

जर सा. बां. विभागाचा उमरी भोकर रस्ता हा गट नं. १८/२ गेलेला असेल तर गट नं. १८/३ वरील हक्क सा. बां. विभागाने सोडावा अशी उपोषणकर्त्यांनी मागणी आहे.

गेली दोन ते तिन वर्षापासून हा रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून बद्रीनारायण मदने यांनी अनेक वेळा सा. बां. विभाग भोकर, जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे अर्ज, विनंत्या करूनही कुणीच दखल न घेतल्यामुळे त्यांना अमरण उपोषणाचा मार्ग स्विकारावा लागलेला आहे.

दिनांक १ जूलै रोजी उपोषण स्थळी गायकवाड, उपविभागीय अधिकारी, सा. बां उपविभाग उमरी यांनी भेट देऊन हे प्रकरण सा. बां. उपविभाग हदगावचे अखत्यारित येते आपण तिथे उपोषण करणे आवश्यक होते असे स्पष्ट केल्यावर संबधित उपोषणकर्त्यांनी उमरी आणि हदगाव हे दोन्ही उपविभाग भोकर सा. बां विभागाचे अंतर्गत येतात नां..? असा प्रतिप्रश्न केल्यावर ते निरूत्तर झाल्याचे सांगितले. अधिकारी वर्गांनी टोलवा टोलवी न करता प्रकरण गांभिर्याने घ्यावे अशी विनंती बद्रीनारायण मदने यांनी केल्याचे स्पष्ट केले आहे.

ह्या प्रकरणी संबधित विभागाने ठोस कारवाई न केल्यास भविष्यात प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दाखल करणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी प्रस्तुत प्रतिधीनीस सांगितले आहे.

# मुदखेड तालुक्यातील ५० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०२ जुलै -**

मुदखेड तालुक्यातील ५० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण दि.१ जुलै रोजी मुदखेड तहसील कार्यालयातील सभागृहात जाहीर करण्यात आले...

यावेळी सरपंच पदाच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व ना.मा.प्र पदाकरिता महिला आरक्षणासह सरपंच पदाकरिता आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले..

बारड - अनुसूचित जमाती(महिला), नागेली - सर्वसाधारण, तिरकस वाडी- सर्वसाधारण (महिला) , पांढरवाडी -सर्वसाधारण, शेंबोली -अनुसूचित जाती, पार्टी वैजापूर- ना.मा.प्र.(महिला), राजवाडी -ना.मा.प्र (महिला), वैजापूर पार्डी- सर्वसाधारण , डोंगरगाव -सर्वसाधारण (महिला), बोरगाव नाद्री -अनुसूचित जाती , ना.मा.प्र-सर्वसाधारण, हिस्सा पाथरड -सर्वसाधारण , पाथरड रेल्वे -सर्वसाधारण (महिला), धनज -अनुसूचित जाती (महिला), सरेगाव -अनुसूचित जाती, जवळा मुराहर- सर्वसाधारण, निवघा -ना.मा.प्र., खांबाळा - ना.मा. प्र (महिला), पिंपळकौठा मगरे -ना.मा.प्र., मेंडका - ना.मा.प्र. (महिला) , वरदडा तांडा -सर्वसाधारण (महिला), वाई -सर्वसाधारण, कोल्हा -अनुसूचित जमाती, डोणगाव - सर्वसाधारण, हजापूर -सर्वसाधारण, वाडी मुक्तापूर -अनुसूचित जाती (महिला) , इजळी- सर्वसाधारण(महिला), मुगट -सर्वसाधारण, आमदुरा -ना.मा.प्र., वाडी मुक्ताजी - सर्वसाधारण (महिला), चिकाळा -सर्वसाधारण, चिकाळा तांडा मोठा - सर्वसाधारण (महिला), चिकाळा तांडा लहान - सर्वसाधारण (महिला), गोपाळवाडी - सर्वसाधारण (महिला), पांगरगाव -अनुसूचित जाती (महिला), पिंपळकौठा चोर -ना.मा.प्र. (महिला), रोहिपिंपळगाव तांडा - ना.मा.प्र., रोहीपिंपळगाव -सर्वसाधारण (महिला) , वाडी नियमतुल्लापुर -सर्वसाधारण, वासरी -अनुसूचित जाती महिला , शंखतीर्थ - सर्वसाधारण (महिला), देवापुर - ना.मा.प्र.(महिला), कामळज- सर्वसाधारण (महिला), माळकौठा- ना.मा.प्र (महिला), महाटी -सर्वसाधारण, चिलपिंपरी - सर्वसाधारण, टाकळी -अनुसूचित जाती(महिला) ४८) खुजडा -सर्वसाधारण (महिला) , दरेगाव -सर्वसाधारण महिला, दरेगाववाडी -ना.मा.प्र.

यावेळी उपविभागीय अधिकारी भोकर प्रविण मेंगशेट्टी यांनी नियंत्रण अधिकारी व आनंद देऊळगावकर तहसिलदार मुदखेड यांनी प्राधिकृत अधिकारी काम पाहिले. सदरील आरक्षण सोडतीस नायब तहसीलदार संतोष कामठेकर व अधिकारी,कर्मचारी सर्व राजकीय पक्षातील पदाधिकारी,संबंधित नागरिक यांची सोडतीस उपस्थिती होती.

# नायगांव तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.०२ जुलै -**

नायगांव तालुक्यातील २०२५ ते २०३० या पंच वार्षिक कालावधीसाठी ग्रामपंचायत सरपंच पदा च्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी नायगांव तहसील कार्यालयात शांततेच्या वातावरणात पारदर्शकपणे पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी क्रांती डोंबे मॅडम यांनी भूषवले. यावेळी तहसीलदार डॉ. सौ. धम्मप्रिया गायकवाड, निवडणूक विभागाचे तहसीलदार सतीश कुलकर्णी, नायब तहसीलदार विजय एरावाड ,गटविकास अधिकारी मिरजकर (पंचायत समिती, नायगाव) आदी मान्यवर उपस्थित होते.



आरक्षण निहाय ग्रामपंचायतींची यादी पुढील प्रमाणे: अनुसूचित जाती (एस सी)तलबीड ,राजगडनगर कोठाळा, पिंपळगाव,मुस्तापूर,गोदामगांव,सोमठाणा खंडगांव अनुसूचित जाती महिला (एस सी महिला) मुगांव, कहाळा बु., वझरवाडी, चारवाडी, टाकळी त.ब., मरवाळी तांडा, खैरगाव, निळेगव्हाण, धुप्पा, अनुसूचित जमाती(डढ) मरवाळी/ कोपरा, रातोळी अनुसूचित जमाती महिला (डढ महिला) होटाळा, रुई खुर्द, इतर मागास वर्गीय (एन.एम.पी.) कार्ला त.मा./माहेगांव ,कुंटूर ,ईकळीमाळ ,इज्जतगांव बु,टाकळी बु.दरेगाव ,मनूर त.ब,बळेगांव ,सांगवी ,डोंगरगाव इतर मागास वर्गीय महिला(एन.एम.पी.महिलागट)ईकळीमोर , पळसगांव/ टाकळ गांव ,शेळगांव छत्री ,हिप्परगा जाने., सुजले गांव ,बरबडा ,राहेर ,नरसी ,मेळगांव ,सावरखेड ,केदारवडगांव खुला प्रवर्ग:-टाकळी त.मा,धानोरा त.मा,सातेगांव ,घुंगराळा , परडवाडी ,कहाळा खुर्द , सालेगांव कु, कांडाळा ,हंगरगा ,लालवंडी, कोकलेगांव ,कोलंबी, गाडगा ,पाटोदा त.ब ,मांजरम, कृष्णूर, मोकासदरा ,ताकबीड , बेटकबिलोली, खुला प्रवर्ग महिलांसाठी:- नरंगल ,मांडणी ,धनंज नावंदी ,रानसुगांव ,वजीरगांव ,अंतरगांव ,अंचोली,बेंद्री ,टेंभुर्णी ,कुंचोली ,गोळेगांव / नायगांव वाडी, हुस्सा ,आलुवडगांव ,शेळगांव गौरी, भोपाळा ,रुई बु देगांव,औराळा याआरक्षण प्रक्रियेमुळे ग्रामपंचायती मध्ये सामाजिक समावेश सुनिश्चित होणार असून, विविध घटकांना स्थानिक स्वराज्यात प्रतिनिधित्वा ची संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनात बिलोली उपविभागीय कार्यालयाचे अव्वल कारकून आलमवाड, तहसील कार्यालयाचे निवडणूक महसूल सहाय्यक . हंबर्डे आणि निवडणुकीचे ऑपरेटर साईनाथ भंडारे यांचे मोलाचे योगदान लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी आणि ग्रामस्थांनी निवडणूक प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील शांततेत आणि पारदर्शक पणे पार पडाव्यात, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# लांजी ते माहूर लालपरी अखेर धावू लागली; सरपंचांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०२ जुलै -**

दुर्गम डोंगराळ भाग असलेल्या आदिवासी बहुल माहूर तालुक्यातील ग्रामीण भागात आजही लालपरी धावत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांना मोठी अडचण येत होती. ही गरज लक्षात घेऊन तालुक्यातील लांजी येथून माहूर पर्यंत बसफेरी सुरू करण्याची मागणी येथील बालिका पंचायत व ग्रामपंचायतच्या माध्यमातून मुख्याधिकारी मेघना कावली व राज्य परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक वडसकर,

माहूरचे आगार प्रमुख विश्वनाथ चिंबाडे यांच्या कडे सरपंच मारोती रेकुलवार यांनी उपसरपंच,ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्यांसह मागणी करुन सातत्याने पाठपुरावा केला होता. या मागणीला यश आले आणि आज मंगळवार १ जुलै पासून माहूर ते लांजी लालपरीची बस सेवा अखेर विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवासानंदाने चेहरे खुलले असल्याचे



पाहायला मिळत आहेत.

एसटी सेवेची ७७ वर्षे पूर्ण झाली आहेत. १ जून, १९४८ रोजी पुणे-नगर मार्गावर पहिली एसटी बस धावली होती. तेव्हापासून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची लाईफलाईन लालपरी आजही त्याच दिमाखात धावत आहे.परंतु, माहूर तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी माहूर शहर व इतर ठिकाणी प्रवास करताना खाजगी वाहनाने जीवघेणी कसरत करावी लागत होती, या समस्येची सोडवणूक करण्यासाठी लांजी येथील बालिका पंचायत व ग्रामपंचायतच्या माध्यमातून मुख्याधिकारी मेघना कावली व राज्य परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक वडसकर, माहूरचे आगार प्रमुख विश्वनाथ चिंबाडे यांच्या कडे सरपंच मारोती रेकुलवार यांनी व लांजी येथील उपसरपंच,ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्यांनी पाठपुरावा करून लांजी ते माहूर बस सेवा विद्यार्थ्यांसाठी सुरू करून घेतली.या बस मधून मंगळवारी विद्यार्थ्यांनी लांजी ते माहूर प्रवास केला.या प्रसंगी माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे आवर्जून उपस्थित होते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर झाल्याने विद्यार्थ्यांचे प्रवासानंदाने खुललेले चेहरे पाहून मला देखील खुप आनंद होत आहे! अशा श्रम साफल्याच्या उत्साहवर्धक बोलक्या प्रतिक्रिया नगराध्यक्ष दोसानी यांनी यावेळी दै.तरुण भारतशी बोलताना दिल्या.

कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यात महाराष्ट्राची एसटी सेवा विस्तारली आहे. या विस्ताराचे संपूर्ण श्रेय महामंडळातील अधिकारी, कर्मचारी, वाहक, चालक, तंत्रज्ञ यांचे आहे. त्यांनी आपल्या लाडक्या लालपरीला हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आणि विठाई या नावांसह आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली आणि आज स्पर्धात्मक युगात देखील ती भक्कम उभी आहे. शासनाच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची ही जीवनवाहिनी अविरत सुखद प्रवास देत आहे. त्याच अनुषंगाने लांजी प्रमाणेच माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व खेड्यापाड्यातून माहूर शहरापर्यंत राज्य परिवहन महामंडळाची सर्वसामान्यांना परवडणारी व अधिक सुरक्षित लालपरीची ही सेवा माहूर आगाराने सुरू करणे नितांत गरजेचे झाले आहे.

### स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि.०२ जुलै -**

हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र राज्याचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदी विराजमान राहणारे महानायक स्व.वसंतराव नाईक साहेब यांच्या ११२व्या जयंती निम्मित जिल्हा परिषद शाळेतील ११२ विद्यार्थ्यांना एक वही, एक पेन व एक पाणी पिण्याचे बाटल वाटप करण्यात आले.

यावेळी महेश देशमुख सरपंच, अनिल राठोड उपसरपंच, नितेश सुर्यवंशी ग्राम पंचायत सदस्य प्रतिनिधी, नागेंद्र वंजे, अनिल पवार बाळू राठोड, तानाजी देवकत्ते आदी उपस्थित होते.

### माऊली 'प्रति पंढरपूर' शोभायात्रेचे ६ जुलै रोजी आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०२ जुलै -**

पंढरपूरला प्रत्यक्ष जाणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी छोटासा अध्यात्मिक आनंद देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो भाविकांचा सहभाग अपेक्षित असलेली माऊली दिंडी 'प्रति पंढरपूर' शोभायात्रेचे ६ जुलै रोजी आयोजन करण्यात येत असल्याची माहिती दिंडीचे मुख्य संयोजक डॉ. रमेश नारलावार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संत नामदेव मंदिर (गायत्री मंदिराजवळ), जुना मोंढा येथून या दिंडीची ६ जुलै रोजी दुपारी २ वाजता सुरुवात होणार असून हे चौथे वर्ष आहे. जुना मोंढा टॉवर बालाजी मंदिर पंचवटी हनुमान मंदिर मुथा चौक वजिराबाद एस. पी. ऑफिस चौक कालामंदिर स्वामी समर्थ मंदिर येथे शोभा यात्रेची सांगता होणार आहे असे डॉ नारलावार यांनी सांगितले.

प्रति पंढरपूर' शोभायात्रे मुळे नांदेड शहर भक्तिमय वातावरणाने भारून जाईल असा विश्वास व्यक्त करीत या धार्मिक उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन माऊली दिंडीचे मुख्य संयोजक डॉ. रमेश नारलावार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे,नानाक साई फाउंडेशन अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे,मेरू शिंपी समाजाचे अध्यक्ष शंकरराव सिंगेवार, गजानन महाराज मंदिर संस्थान अध्यक्ष डॉ. तुकाराम तळणकर,डॉ. संजय मानाठकर, मोहन पाटील, गणेश ठाकूर, डॉ. नरेश रायेवार, अनिल पापंटवार, मधुकर मोतेवार, गणेश गादेवार, गजानन पिंपरखेडे (वकील), धनंजय उमरीकर,सौ. प्राची चौधरी, सौ. माला शर्मा, कु. ज्योती पाटील, सौ. संध्याताई छपरवाल आणि माऊली दिंडी परिवार नांदेड यांनी केले आहे.

# हदगाव तालुक्यातील ११८ सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०२ जुलै -**

हदगाव तालुक्यातील २०२५ ते ३० या कालावधीसाठी तालुक्यातील एकूण ११८ ग्रामपंचायतचे आरक्षण सोडत दिनांक १ जुलै रोजी तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच हदगावचे तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरक्षण सोडत पार पडण्यात आली. ही सगळी प्रक्रिया इन कॅमेरे पार पडण्यात आली यावेळी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार चामनीकर, निवडणूक विभागाचे लिपिक रत्नाकर डांगरे यांच्यासह विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

एकुण ११८ ग्रामपंचायती मधून सर्व प्रथम अनुसूचीत जातीच्या प्रवर्गासाठी आरक्षणाची कार्यवाही सुरु करण्यात आली. यासाठी एकुण ग्रामपंचायत अनु. जातीच्या लोकसंख्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने घेण्यात आली. सन-२००५, २०१०,२०१५ व २०२० या वर्षामध्ये ज्या ग्रामपंचायतींना अनु. जाती या प्रवर्गासाठी आरक्षण देण्यात आले होते अशा ग्रामपंचायत वगळण्यात आल्या व उर्वरीत ग्रामपंचायत मध्ये चक्राकार पद्धतीने अनु. जाती २६ अनुसूचित जाती आरक्षण पैकी १३ जागा महिलांसाठी तर १४ अनुसूचित जमाती जागा पैकी महिला ७ जागा अनुसूचित जमाती महिलांसाठी आरक्षीत करण्यात आले. तसेच ३२ नामाप्र साठी ग्रामपंचायत आरक्षीत झाल्यानंतर त्यातील १६ ग्रामपंचायत नामाप्र महिलांसाठी आरक्षीत महिला आरक्षित करण्यात आले. यानंतर उर्वरीत ४६ ग्रामपंचायती सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटलेल्या आहेत. ४६ ग्राम पंचायत मधून २३ ग्राम पंचायती सर्वसाधारण महिलासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. अशाप्रकारे हदगाव तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत पार पडली. तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायत समजल्या जाणाऱ्या तामसा, निवघा व तळणी या तिन्ही ग्रामपंचायतीचा कारभार महिलांच्या हाती असणार आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका

## २७ लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ जुलै**

चकलांबा दि.२/०७/२०२५ पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात १) विकास संपत केसभात रा. गायकवाड जळगाव २) मोहम्मद अहमद शेख रा. सुकली रा. शेवगांव जिल्हा अहिल्यानगर अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत.बुधवारी (दि.२) महारटाकळी येथे नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व एक जेसीबी आढळून आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील पोह/१५३३ अमोल अंकुश येळे पोशी / २००४ कैलास विठ्ठल खटाने पोशी/ २३१ प्रशांत कल्याण घोंगडे आर्दींनी केली आहे.

# निराधार व वृद्ध महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी बीडचे तहसीलदार शेळके व्हिडिओ कॉलवर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**



शेतकऱ्यांसाठी शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा म्हणजे शेतरस्ता असतो . परंतु काही अडचणींमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील रस्ता नसल्यामुळे शेतीमाल तसेच दैनंदिन कामकाजासाठी अडचणी निर्माण होऊन भांडणे होतात , असा सार्वत्रिक अनुभव आहे.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत . शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करण्यात यावे , त्यासाठी महाराजस्व अभियान राबवावे , मोकळे करून दिलेल्या रस्त्याच्या नोंदी सातबारावर घ्याव्यात , जिवंत सातबारा म्हणजेच सातबारा वरील मयतांची नावे कमी करून वारसांची नावे लावून घ्यावी , याशिवाय सातबारावर असलेल्या अनावश्यक नोंदी कमी करण्यात याव्यात अशा एक ना अनेक गोष्टी महसूल मंत्र्यांनी करून घेण्याचा चंग बांधलेला आहे.नागरिकांना वाळू ऐवजी कृत्रिम वाळू कशी उपलब्ध होईल यासाठी सुद्धा त्यांचा मोठ्या प्रमाणात पाठपुरावा सुरू आहे . छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे सस्ती अदालत योजनेतून शेतकऱ्यांना कमी खर्चातून कसा रस्ता मिळेल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत . त्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या बैठका घेऊन विविध प्रकारच्या सूचना केल्याची दिसून येते.बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्हाभरात शेतकऱ्यांप्रती तसेच वृद्ध , दिव्यांग यांच्याप्रती असलेल्या मदत भावनेतून अनेक नवीन उपक्रम सुरू केले . जिल्हाधिकारी स्वतः तालुकास्तरीय बैठका घेऊन महाराजस्व अभियान , छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजना , फार्मर आयडी काढणे , जिवंत सातबारा मोहिमा राबविणे यासाठी मार्गदर्शन करत आहेत.

# डॉक्टर्स डे निमित्त २६ जणांचे रक्तदान

## रोटरी क्लब व आय.एम.ए.चा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ जुलै**



डॉक्टर्स डे च्या निमित्ताने इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २६ जणांचे रक्तदान करण्यात आले.

येथील इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान,जीवनदाई ब्लड बँक,भुतडा हॉस्पिटल यांच्या वतीने डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,डॉ.राजेश इंगोले,परमेश्वर गित्ते,आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे,सचिव डॉ.उद्धव शिंदे,रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,डॉ.अनिल भुतडा, डॉ. मनिषा भुतडा,विनोद पोखरकर,डॉ.सचिन पोतदार,यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.या माध्यमातून समाजाशी रक्ताने नाते जोडण्याची किमया साध्य होते.असे मुंदडा यावेळी बोलताना म्हणाले. यावेळी डॉ.इंगोले,गित्ते, यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी डॉ.नवनाथ घुगे यांनी या रक्तदान शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगून आय.एम.ए. करीत असलेल्या कामांची माहिती दिली. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले.या प्रसंगी डॉ.एन.पी.देशपांडे,डॉ.ज्योती देशपांडे, डॉ.शुभदा लोहिया, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ.दीपक लामतुरे, डॉ.अतुल शिंदे, डॉ. अरुणा केंद्रे, डॉ.मनिषा पवार संगीता नावंदर,डॉ.प्रसाद कुलकर्णी, डॉ.विनोद जोशी,रोटरी क्लबचे कल्याण काळे, धनराज सोळंकी, रमेश देशमुख, भीमाशंकर शिंदे, बालाजी घाडगे, जगदीश जाजू, मंदाकिनी गित्ते,यांची उपस्थिती होती.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त माजलगाव येथे कृषी दिन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जुलै**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि पंचायत समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने १ जुलै हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांची जयंती कृषी दिन म्हणून पंचायती समिती सभागृह माजलगाव येथे साजरा करण्यात आले

कार्यक्रमाचे उद्‌घाटन श्रीमती ज्योत्सना मुळीक प्रशासक तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना श्री एस एस भोकरे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक यांचे जीवन चरित्र व कार्य याविषयी उपस्थितना माहिती दिली प्रमुख मार्गदर्शक श्री अतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी सध्याच्या परिस्थितीमध्ये पिकाचे संरक्षण करण्याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर श्री गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक साहेब यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य व अमुलाग्र बदल तसेच शेतकऱ्यांना सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतीमध्ये असणाऱ्या अडचणीवर मात करून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीमधील उत्पादन वाढवण्या विषयी शेतकऱ्यांना संबोधित केले या कार्यक्रमात सन २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. श्री डोंगरे साहेब सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिंदे उद्यान पंडित आणि अण्णासाहेब जगताप वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाला कृषी विभागातील आणि पंचायत समिती येथील अधिकारी,कर्मचारी तसेच कृषी सखी आणि शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले व आभार श्री डी. एल. गडपाळे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी मानले.

# किसनराव हुलगे सरांना काम करून घेण्याची कला अवगत होती-श्रीकृष्ण देशमुख

## मुख्याध्यापक किसनराव हुलगे यांचा सेवानिवृत्ती चा कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जुलै**

शाळेचा किंवा संसारिक कुठलाही कामाचा भार जास्त झाला तरी कुणावरही न चिडचिड करता रागवता अत्यंत शांत संयमाने आणि कमी बोलून काम करून घेण्याची कला मुख्याध्यापक किसनराव हुलगे यांना अवगत होती ती काला शिक्षकांनी घ्यावी असे आव्हान आधीव्याख्याता डायट श्रीकिसन देशमुख यांनी केले आहे.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किट्टी आडगावचे मुख्याध्यापक किसनराव लक्ष्मणराव हुलगे वयोमानानुसार ते सेवानिवृत्त झाले आहेत त्यानिमित्त जिल्हा परिषद केंद्र सावरगाव यांच्या वतीने दिनांक २८ जून २०२५ रोजी सुखसागर हॉटेल येथे आयोजित केलेल्या सेवापूर्ती सत्कार समारंभात देशमुख बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक समाधान शिंदे होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश राव फपाळ चेअरमन कपिल डोंगरे, चेअरमन विलासराव शेजुळ प्रल्हाद दळवी उपस्थित होते.सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा चे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक किसनराव हुलगे व त्यांच्या सुविध पत्नी सौ संगीता कोरडे यांचा सपत्नीक साडी कपडे शाल पुष्प पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी तुकाराम येवले रमेश फपाळ समाधान शिंदे विलास शेजुळ भारत टाकणखार मुकुंद कदम प्रभाकर साळवे सौ वर्षा कोरडे विजया कोरडे अमर हुलगे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केली या कार्यक्रमास मुख्याध्यापक पी व्ही शिंदे अशोक वाडेकर यांच्यासह सावरगाव केंद्रातील घटक शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरभद्र स्वामी यांनी केले तर आभार प्रल्हाद दळवी यांनी मानले.

# श्रीनिवास राऊत यांची 'महाराष्ट्र नाभिक महामंडळ'च्या परळी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती

## समाजभान, सेवा वृत्ती आणि नेतृत्व कौशल्याची झाली प्रशंसनीय दखल



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जुलै**

नाभिक समाजाच्या हक्कांसाठी दिवस-रात्र परिश्रम करणारे, समाजसेवेला आयुष्य समर्पित करणारे आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरलेले श्रीनिवास बबनराव राऊत यांची 'महाराष्ट्र नाभिक महामंडळ' परळी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड केवळ एका पदाची नाही, तर त्यांच्या दीर्घकालीन कार्यकर्तृत्वाला समाजाने दिलेली सन्मानाची पावती आहे.

या निवडीचा गौरव सोहळा परभणी येथे दिमाखात पार पडला. ओबीसी नेते तथा बारा बलुतेदार महासंघाचेअध्यक्ष मा. कल्याणजी दळे साहेब आणि परभणी महानगरपालिकेचे उपमहापौर मा. भगवानरावजी वाघमारे दादा, कार्याध्यक्ष दामोदर काका बिडवे, सरचिटणीस पांडुरंग भवर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र भैय्या कावरे, विभागीय अध्यक्ष युवराज शिंदे, बीड जिल्ह्याचे अध्यक्ष दिलीप झगडे, युवा नेते तथा बिल्डर आणि शासकीय गुतेदार गणेश वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीनिवास राऊत यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



नियुक्तीचे अधिकृत पत्र महामंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष मा. दिलीप आसाराम झगडे यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आले असून, या निवडीत महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष मा. कल्याणराव दळे,परभणीचे उपमहापौर भगवान दादा वाघमारे कार्याध्यक्ष दामोदर बिडवे, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.नियुक्तीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना श्रीनिवास म्हणाले, ही केवळ माझ्या नावावर आलेली जबाबदारी नाही, तर नाभिक समाजाच्या विश्वासाची शिदोरी आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मी झटेन. नियमबद्धता, पारदर्शकता आणि एकजुटीच्या बळावर नाभिक समाजाचा सन्मान वाढवण्याचा माझा प्रयत्न राहील.

या निवडीने नाभिक समाजात नवचैतन्य आणि उत्साह संचारला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या निवडीचे स्वागत करत, श्रीनिवास राऊत यांच्या नेतृत्वात समाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

गौरव समारंभास परळी शहर व तालुक्यातील विविध गावांमधून समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये शहराध्यक्ष प्रभाकर कांबळे, माजी तालुकाध्यक्ष बालाजी बहिरे, ज्येष्ठ नेते बबनराव राऊत, माजी शहराध्यक्ष तथा युवा नेते शरद कावरे, कैलास शिंदे अजय राऊत हरिभाऊ घुले समाधान वाघमारे उत्तरेश्वर बहिरे राधाकिसन कांबळे हनुमान ठोंबरे अमोल बहिरे नितीन इंगळे श्रीनाथ राऊत झाले गौरव राऊत अश्विन कचरे बापू शिंदेअजय बहिरे, अनिल सावंत, नवनाथ गवळी, मनोज शिंदे, अनिकेत कावरे, ईश्वर शिंदे, कैलास शिंदे, अजय राऊत, हरिभाऊ घुले समाधान वाघमारे, दिनेश गिराम, उत्तरेश्वर बहिरे, राधाकिसन कांबळे, हनुमान ठोंबरे, अमोल बहिरे, नितीन इंगळे, वैभव बिडवे, सौरभ राऊत, श्रीनाथ राऊत, गौरव राऊत, अश्विन कचरे, बापू शिंदे यांचा समावेश होता.कासारवाडी, पुस, गाडे पिंपळगाव, सिरसाळा येथून आलेले महादेव सुरवसे, पिंटू घोडके, नारायण कांबळे, हरिभाऊ कांबळे, दत्ता कांबळे, नंदू सुरवसे, धनंजय कावरे, विशाल कावरे, आदित्य कावरे, रत्नाकर कावरे, अनिल कावरे, राजेश्वर कावरे, सुदर्शन कावरे, हनुमान ठोबरे, पवन राऊत, गोविंद राऊत, विशाल ठोबरे, करण वाईगडे, हरी दळवे यांच्यासह असंख्य नाभिक समाज बांधवांनी आपल्या उपस्थितीने सोहळ्याला गौरव प्राप्त करून दिला.

# रोटरी क्लबचे रक्तदान शिबीरात ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जुलै**



येथील रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी नववर्ष दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे मंगळवार रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रो डॉ राधाकिसन डाके यांच्या माऊली हार्ट केअर हॉस्पिटल मध्ये आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. क्लब चे नवनिर्वाचित अध्यक्ष रो विनोदकुमार बजाज, नवनिर्वाचित सचिव रो दिगंबर महाजन यांनी या कामी पुढाकार घेतला. रो सुरेश भानप, रो अशोक बजाज, रो स्मिता लिंबगावकर,रो शशिकिरण गडम, रो अर्चना पवार, रो स्वानंद कुलकर्णी, रो लता जोशी, रो शंकर जुजगर, रो दामोदर संदीकर, रो राहुल लंगडे, रो मधुकर घुबडे, रो प्रभाकर साळेगावकर, रो वर्षा सोळंके, रो बाळासाहेब देशपांडे, रो दीपक देशमुख, रो संदीप गुंडेवार यांची या प्रसंगी उपस्थिती होती. माऊली हार्ट केअरचे कर्मचारी, श्रीसिद्धेश्वर भक्त मंडळ यांनी रक्तदान शिबिरास सहकार्य केले.

# बेकायदेशीर रित्या अग्नी शस्त्र बाळगाणाऱ्या तीन इसमांना शिवाजीनगर पोलीसांनी केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

दि.१/०७/२०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धानोरा रोड, बीड या ठिकाणी पांढऱ्या रंगाची ह्युडांई XCENT गाडी क्र.MH 05 BJ 1988 मध्ये दोन इसम अग्निशस्त्र ताब्यात बाळगुन घेवुन जात आहेत अशी गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना मिळालेने सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार करुन रवाना केले होते.

नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे धानोरा रोडवरील पंढरी कॉलनी समोर सापळा रचुन थांबलेले असतांना पांढऱ्या रंगाची ह्युडांई XCENT गाडी क्र.MH 05 BJ 1988 आल्याने सदर गाडी अडवुन त्यामध्ये दोन इसम १) आमोल कल्याण पवार वय २९ वर्षे रा. घोडका राजुरी ता.जि. बीड ह.मु. बार्शी नाका, (२) बाबुराव मन्मथ वैराळे वय ३३ वर्षे रा.कदमवाडी ता.जि. बीड मिळुन आले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीत इसम नामेबाबुराव मन्मथ वैराळे याच्या कमरेला एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन असलेला जु.वा.किं.५०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची ह्युडांई XCENT गाडी क्र.MH 05 BJ 1988 जप्त करण्यात आली. आरोपीनां पिस्टल विक्री करनारा इसम ३) राहुल प्रकाश तुपे रा. आशा टॉकीज धानोरा रोड बीड यास त्याच्या राहते घरुन ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपी राहुल प्रकाश तुपे हा जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने बीड जिल्हातुन तडीपार असून त्यावर तो तडीपारीच्या काळात बीड जिल्हात मिळुन आल्याने त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील आरोपी क्र.१) आमोल कल्याण पवार यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. (२) बाबुराव मन्मथ वैराळे याचे विरुध्द जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी क्र.३) राहुल प्रकाश तुपे याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्दचे गुन्हे तसेच अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि / संदिप दुनगहु, सपोनि/गजानन क्षिरसागर, ग्रे.पो.उप.नि./अब्दुलखय्युम कुरेशी, पोहवा/१६६४ रविद्र आघाव, पोना/ ४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/९०४लिंबाजी महानोर, पोशि/ ५११ अभिजीत सानप, पोशि/४८५ विलास कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/ ज्ञानेश्वर धोत्रे हे करत आहेत.

# परळीतील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांची गर्दी; नवीन भक्त निवास श्रावणात तत्काळ सुरू करा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ जुलै**



परळी नगरीतील प्रभू श्री वैद्यनाथ हे देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असून, इथे दररोज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः श्रावण महिना सुरू होताच लाखो श्रद्धाळू परळीत दाखल होतात. यामुळे शहरात भाविकांची मोठी गर्दी निर्माण होते. मात्र, भाविकांच्या निवास व्यवस्थेचा प्रश्न कायम आहे. सध्या परळीत भाविकांसाठी पुरेशी निवास व्यवस्था उपलब्ध नसल्याने भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.हीच बाब लक्षात घेता, परळी नगरपालिका कार्यालयालगत तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत नव्याने बांधण्यात आलेले भक्त निवास सध्या पूर्णत्वास गेले आहे. हे भक्त निवास भवन, भाविकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात ॲड. मनोज संकाये यांनी नमूद केले की, श्रावण महिना सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. लाखो भाविक परळीत येणार आहेत. मात्र त्यांच्यासाठी योग्य निवासाची व्यवस्था नसेल, तर ही भाविकांसाठीच नव्हे तर परळीच्या यशाचीही शोकांतिका ठरेल. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ निर्णय घेऊन हे भक्त निवास कार्यान्वित करावे असे म्हटले आहे.भाविकांना निवासाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांना मानसिक व शारीरिक आराम मिळेल, परळीतील तीर्थक्षेत्राचे महत्त्व अधिक वाढेल, भाविकांचा प्रवास अधिक समाधानकारक व सुरक्षित ठरेल, तसेच शहराच्या पर्यटन विकासालाही चालना मिळेल.अशा या गरजांच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने पावले उचलून नव्याने बांधलेले भक्त निवास श्रावण महिन्यापूर्वीच भाविकांच्या सेवेसाठी खुले करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांच्यासह शिरीष सलगरे ,कैलास रिकीबे ,संतोष चौधरी ,प्रवीण रोडे ,राजू वायबसे ,संतोष कांबळे इतर मित्र मंडळाचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.

# पोक्सो च्या गुन्हयात अवघ्या ४८ तासांत दोषारोपपत्र दाखल

## पिंक पथक माजलगाव यांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**मालगाव दि.२ जुलै**

राज्यात तसेच बीड जिल्हयात महिला व अल्पवयीन मुलींवरील त्याचाराच्या घटना सध्या संवेदनशील बनलेल्या आहेत. बिडचे पोलीस अधिक्षक नवनित काँवत यांनी प्रभार घेतल्या पासुन जनतेसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. पोलीस अधीक्षक काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगावच्या पिंक पथकाने तात्काळ कारवाई करत पोस्को प्रकरणातील आरोपीला अटक करून ४८ तासात कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

पोलीस स्टेशन माजलगांव शहर येथे दि.२९ जून रोजी रात्री एका अल्पवयीन पिडीतेने दिलेल्या फिर्यादी वरुन आरोपी विठठल लिंबुरे याच्या विरुध्द गुरनं २४०/२०२५ कलम ७४.७८.३५१.३५२ बीएनएस व ८.१२ पोक्सो प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.सदरील गुन्हयाचा तपास पिंक पथकाकडे आला असता पिंक पथकाने गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन तात्काळ गुन्हयातील आरोपी विठठल लिंबुरे याला अटक केली. तसेच त्याला कोर्टासमोर हजर करुन त्याचा पीसीआर घेउन त्याने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल जप्त केली व संपुर्ण तपास अतीशय जलदगतीने करुन या विनयभंग व पोक्सो च्या गुन्हयामध्ये अवघ्या ४८ तासांत दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले आहे. पोक्सो च्या गुन्हयामध्ये बीड जिल्हयात इतक्या जलदगतीने दोषारोपपत्र दाखल केल्याचे हे पहिलेच प्रकरण आहे. पोलीसांच्या कार्यतत्परतेमुळे महिला व मुलींमध्ये सुरक्षेची भावना वाढीस लागनार आहे.सदरील गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक नवनित काँवत, पो. अधिक्षक अंबाजोगाई, चेतना तीडके, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथक माजलगावचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक महेश भोसले व पोहेकॉ नवनाथ गोरे यांनी केला आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com